# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५

किंमत ४ ₹


# ‘स्वच्छ मिशन’ला हरताळ

## जिल्ह्यातील ग्रामीण भागात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे

| प्रमोद जाधव |
| अलिबाग |

**वाढत्या कचऱ्याबरोबरच प्लास्टिकमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचा धोका निर्माण झाला आहे. रायगड जिल्हा परिषदेने स्वच्छ भारत अभियानांतर्गत वेगवेगळे उपक्रम राबवून जनजागृती केली. ‘नव्याचे नऊ दिवस’ या उक्तीप्रमाणे जिल्ह्यात कारभार चालला. परंतु, ग्रामीण भागात आजही ठिकठिकाणी कचऱ्याचा ढिगारा पडून असल्याचे चित्र आहे. त्यामुळे स्वच्छ भारत अभियानाला हरताळ फासण्यात आल्याचे दिसून येत आहे.**

रायगड जिल्ह्यात ८०९ ग्रामपंचायती असून, दोन हजारांहून अधिक गावे, वाड्यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजार इतकी आहे. ग्रामीण भागांचा विकास हा जिल्हा परिषदेमार्फत केला जातो. ग्रामपंचायतींकडून आलेल्या योजनांची पडताळणी करून जिल्हा परिषदेमार्फत योजनांची अंमलबजावणी केली जाते. ग्रामीण भागात घनकचऱ्याचा प्रश्न हा गंभीर होत चालला आहे. काहीजण शेतांसह रस्त्याच्या दुतर्फा, नदी, नाल्यामध्ये कचरा टाकून देतात. त्यामुळे पावसाळ्यात पूरपरिस्थिती उद्भवण्याची भीती निर्माण होत असताना पर्यावरणाचा समतोलही बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. रायगड




> **ग्रामीण भागात कचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावण्याबाबत ग्रामपंचायतींना सूचना केल्या जातील. स्वच्छतेवर भर देणे‘ ही काळाची गरज आहे.**
> – **भारत बास्टेवाड,** मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

जिल्हा परिषदेमध्ये स्वच्छता मिशन विभाग कार्यरत आहे. या विभागामार्फत जिल्ह्यामध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याबरोबरच वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. प्लास्टिकसह अन्य कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत ग्रामपंचायतींना मार्गदर्शन केले जाते. कचऱ्याबाबत जनजागृती करण्यासाठी फलक देखील लावले जातात. ग्रामीण भागातील नागरिकांना कचऱ्याचे पान २ वर

# निष्ठावंत कार्यकर्त्याला मुकलो




| भाकरवड | वार्ताहर |

स्व. प्रमोद ठाकूर यांच्या जाण्याने समाजाच्या हितासाठी सतत धडपडणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्याला आपण मुकलो असून, त्यांच्या जाण्याने शेतकरी कामगार पक्षाची कधीही न भरुन येणारी मोठी हानी झाली आहे. कुसुंबळे ते वाघविरा रस्ता होण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. एक सामाजिक बांधिलकी जपणारा कार्यकर्ता आम्ही गमावल्याचे दुःख आहे, अशा शब्दात शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आ. जयंत पाटील यांनी स्व. प्रमोद ठाकूर यांना श्रद्धांजली अर्पण केली. शेकापच्यावतीने कुसंबळे येथे रविवारी (दि. ५) शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जयंत पाटील बोलत होते.

अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे येथील अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती प्रमोद केशव ठाकूर यांचे गुरूवारी (दि. २६ डिसें.२०२४) राहत्या घरी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती मिळावी यासाठी भारतीय शेतकरी

- **भाई जयंत पाटील यांच्याकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण**
- **स्व. प्रमोद ठाकूर यांची शोकसभा संपन्न**

कामगार पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली तसेच शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी भाई जयंत पाटील यांच्यासह अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्ष सुप्रिया पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, तालुका चिटणीस अनिल पाटील, शेकाप नेते नृपाल पाटील, अनिल गोमा पाटील, ज्येष्ठ नागरिक संघटना कुसुंबळे अध्यक्ष अमृत पाटील गुरुजी, पत्रकार प्रकाश म्हात्रे, माजी सरपंच विलास म्हात्रे, संगीता म्हात्रे, माजी सरपंच नरेश म्हात्रे, जीवन नीळकर, वैभव पिंगळे, मच्छिंद्र पिंगळे, मोहन धुमाळ, ज.का. ठाकूर गुरुजी, दत्ताराम पाटील, मच्छिंद्र पाटील हेमनगर, कमला म्हात्रे, दिगंबर म्हात्रे, शैलेश पाटील कोलघर, तसेच विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आध्यात्मिक, क्रीडा आदी क्षेत्रांतील तीनशेहून अधिक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ॲड. मानसी म्हात्रे यांनी प्रमोद ठाकूर यांच्याबद्दल आदरयुक्त भाव व्यक्त केला. त्या म्हणाल्या की, सर्वांच्या सुख–दुःखात सहभागी होऊन लग्नकार्यात काही बाकी तयारी पान २ वर

### ‘आठवणींना उजाळा देणारे कार्य करु’

स्व. प्रमोद ठाकूर यांनी अगदी कमी कालावधीत राजकीय, सामाजिक, क्रीडा अशा अनेक क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. त्यांना पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी खंबीरपणे पार पाडून या विभागाचा आपल्या कर्तृत्वाने कायापालट केला आहे. म्हणूनच त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी प्रमोद ठाकूर यांच्या नावाने ओळखले जाईल असे कार्य आपण या विभागात करू, अशी ग्वाही देऊन संपूर्ण पाटील कुटुंब ठाकूर परिवाराच्या पाठीशी असल्याचे जयंत पाटील म्हणाले.

# मातृवंदना अनुदानापासून महिला उपेक्षित

| नेरळ | प्रतिनिधी |

प्रधानमंत्री मातृवंदना योजनेमधून शासनाकडून पहिल्या अपत्यासाठी महिलांना पाच हजार रुपये इतकी आर्थिक मदत दिली जाते. कर्जत तालुका आरोग्य खात्यामार्फत प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचे काम पाहिले जाते; मात्र या कर्मचाऱ्यांनी मागच्या कित्येक वर्षात आशा सेविकांकडून आलेले योजनेचे फॉर्म ऑनलाइन करण्याची कार्यवाही झालेली नाही, त्यामुळे तालुक्यातील सात हजार ७०० महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या आहेत, अशी माहिती माहिती अधिकारात समोर आली आहे.

**कर्जत तालुक्यातील ७,७०० महिला या योजनेच्या लाभापासून वंचित**

कर्जत तालुका आरोग्य खात्याकडे व जिल्हा आरोग्य खाते रायगड जिल्हा परिषद यांच्याकडे माहितीच्या अधिकारात माहिती मागविण्यात आली होती; २०१७ ते मार्च २०२३ पर्यंत प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचे एकूण ५,३९२ महिलांचे फॉर्म मिळाल्याचे आणि त्यातले ४,८३४ फॉर्म ऑनलाइन केल्याची माहिती तालुका आरोग्य खात्याकडून माहितीच्या अधिकारात दिली होती. आशा सेविकांकडील रजिस्टरच्या झेरॉक्स माहितीच्या अधिकारात मागितल्यानंतर जवळपास १० हजार ४८१ महिलांचे फॉर्म तालुका आरोग्य खात्याकडे दिल्याचे दिसून येते. मात्र, संबंधित कर्मचाऱ्याने आतापर्यंत फक्त पान २ वर

### योजनेवर दृष्टिक्षेप

- २०१७ ते मार्च २०२३ पर्यंत एकूण ५,३९२ फॉर्म मिळाले असून, त्यातील ४,८३४ फॉर्म ऑनलाइन केल्याची माहिती तालुका आरोग्य विभागाने दिली.
- या योजनेचे सर्व्हर फेब्रु. २०२३ मध्ये बंद झाले ते नॉव्हेंबर २०२३ मध्ये पुन्हा सुरु झाले. त्यामुळे त्या नऊ महिन्यांत अर्ज ऑनलाईन होऊ शकले नव्हते.

# अखेर ‘तो’ टॉवर हटवला

## चार वर्षांनंतर प्रशासनास जाग



**कोर्लई :** तीन जून २०२० रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळात मुरुडच्या तहसील कार्यालयाजवळ वनविभाग, ट्रेझरी, सेतु कार्यालय इमारतीवर पडलेला मोबाईल टॉवर अखेर चार वर्षांनंतर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे यांच्या पाठपुराव्यानंतर काढण्यात आला.

राज्यात गेल्या चार वर्षांपूर्वी झालेल्या चक्रीवादळाचा तडाखा मुरुडलाही पान २ वर

# आरोग्य सुविधांच्या अभावामुळे एकाचा बळी

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात आरोग्य सुविधांच्या अभावाचा फटका पुन्हा एकदा एका तरुणाच्या मृत्यूला कारणीभूत ठरला आहे. कर्जत येथे चांगली वैद्यकीय सेवा उपलब्ध नसल्याने पनवेल येथे रुग्णाला न्यावे लागते. त्याचा फटका आज योगेश वैद्य यांना बसला.

कर्जतमधील व्यावसायिक योगेश वैद्य हे प्रकृती खालावल्याने अस्वस्थ झाले. त्यांनतर ते नेहमीच्या क्लीनिकमध्ये गेले, तेथून त्यांना पुढील उपचारासाठी पनवेलला जाण्याचा सल्ला देण्यात दिला. त्यानुसार ते आपल्या मित्रासोबत पनवेलच्या दिशेने निघाले. मात्र, शेडुंग टोलनाक्याजवळ पोहोचताच त्यांची प्रकृती आणखी खालावली. हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारावर पोहोचण्यापूर्वीच त्यांनी गाडीतच अखेरचा श्वास घेतला होता. कर्जतमध्ये एक सुसज्ज हॉस्पिटल उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. मात्र, स्थानिक नेते आणि प्रशासनाने या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केले आहे. वैद्य यांच्या मृत्यूनंतर हा विषय पुन्हा एकदा समोर आला आहे. नागरिकांनी प्रशासन आणि नेत्यांवर टीका करत कर्जतमध्ये अद्ययावत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. आरोग्यविषयक सोयींसाठी पनवेल, मुंबई किंवा पुण्याचा आधार घेणे ही लांबच्या प्रवासामुळे रुग्णांसाठी जीवघेणी बाब ठरत असल्याचे मत व्यक्त केले.








# एसपीआर फार्मा कंपनीला आग



**रसायनी :** रसायनी औद्योगिक वसाहतीमधील कैरे गावाजवळील एसपीआर फार्मा कंपनीला आग लागल्याने कंपनीच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दुपारची वेळ असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न केले.

आगीचे कारण अद्याप समजले नसले तरी कॉस्मेटीक उत्पादन तयार करण्यासाठी रॉ मटेरिअल बनविण्याच्या मालाचे आगीत नुकसान पान २ वर




## तळा शहरातील सार्वजनिक स्मशानभूमीची दुरवस्था

| तळा | वार्ताहर |

तळा शहरातील सार्वजनिक स्मशानभूमीची अत्यंत दुरवस्था झाली असून, मरणानंतरही याठिकाणी प्रेताला यातना भोगाव्या लागत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

तळा शहरातील कुंभार समाज स्मशानभूमीशेजारी असलेली सार्वजनिक स्मशानभूमी आठ गुंठे जागेत विस्तारलेली असल्याचे सांगितले जात आहे. प्रत्यक्षात मात्र अर्ध्या गुंठ्यातच ही स्मशानभूमी असल्याचे दिसून येते. तळा ग्रामपंचायत असताना उभारण्यात आलेली ही स्मशानभूमी तळा नगरपंचायतीत रूपांतर झाल्यानंतरही त्याच अवस्थेत आहे. शहरात प्रत्येक समाजाच्या वेगवेगळ्या स्मशानभूमी असल्याने ज्यांना स्मशानभूमी नाही असे नागरिक अंत्यविधीसाठी सार्वजनिक स्मशानभूमीचा वापर करतात. परंतु, या ठिकाणी नगरपंचायत प्रशासनाकडून प्रेत जाळण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली नाही, त्यामुळे अचानक एखाद्याचा मृत्यू झाल्यास ते प्रेत जाळण्यासाठी साधन सामुग्री उपलब्ध करताना नातेवाईकांची तारांबळ उडते.


या स्मशानभूमीच्या आजूबाजूला पान २ वर

**‘रोहयो’मधून अंमलबजावणी करा | शेतकऱ्यांची शासनाकडे मागणी**

# कोकणासाठी ‘गोळेगणी पॅटर्न’ वरदान

| शैलेश पालकर |
| पोलादपूर |

कोकणातील शेतकऱ्यांची जमीन दुर्गम, तीव्र उताराची आणि कमी आकाराच्या बांधा–बांधांची असल्याने या शेतजमिनीला जलसिंचनासाठी मोठी शेततळी घेणे शक्य होत नव्हते. म्हणून पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथे सर्वात आधी छोट्या आकाराचे शेततळे बांधण्यात आले. या शेततळ्याला महाराष्ट्र शासनाकडे जलकुंड नावाने प्रस्ताव करण्याइतपत एकाच गावात २२ जलकुंडांचे काम केले. शुक्रवार, दि. ३ जानेवारी रोजी राज्य सरकारच्या कृषी आयुक्तालयाने परिपत्रक काढून



### डोंगराळ भागात फायदेशीर

**शेततळ्याचे आकारमान तसेच त्याकरिता येणारा खर्च या बाबींचा विचार करता कोकणातील दुर्गम व डोंगराळ, कातळ भागात शेततळे खोदणे शक्य नाही, अशा जागेवर हा जलकुंड उपचार फायदेशीर असून, ५ मी. लांब ५ मी. रूंद आणि २ मी. खोल आकारमानाचे जलकुंड कोकणातील सर्वसामान्य फळबाग शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.**

> **लवकरच जलकुंडनिर्मितीसाठी सहभाग घेणाऱ्या व ‘जलकुंडाचा गोळेगणी पॅटर्न’ तयार करणाऱ्या शेतकरी, कृषी विभागाचे अधिकारी, पत्रकार व लोकप्रतिनिधी यांचा सर्वांचा गौरव करून गोळेगणीचे ग्रामस्थ जल्लोष करणार आहेत.**
> – **प्रकाश दळवी,** सरपंच

‘जलकुंडाचा गोळेगणी पॅटर्न’ला कोकणातील पाचही जिल्ह्यांसाठी राबविण्यास मान्यता दिली असून, तो गोळेगणी गावाच्या नावाने ओळखला जाणार आहे.

२०१९ पान २ वर

# ‘जलजीवन’ची कामे कूर्मगतीने

## १३३ पैकी ५७ ठिकाणची कामे बंद स्थितीत; १७ ठिकाणची कामे पूर्ण

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

जलजीवन मिशन योजनेची गाडी पनवेलमध्ये संथ गतीने सुरू आहे. आत्तापर्यंत १३३ पैकी केवळ १७ ठिकाणचीच कामे पूर्ण स्थितीत आहेत. तर ५७ ठिकाणची कामे सध्या बंद स्थितीत असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली. त्यामुळे उर्वरित कामे कधी पूर्ण होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ठेकेदारांच्या हलगर्जीपणाचा फटका गावातील नागरिकांना बसत आहे.

पनवेल तालुक्यातील आंबे तर्फे तळोजे, आंबिवली, चिखले, दापिवली, दिघाटी, जांभिवली, कल्हे, कराडे बुद्रुक, करंबेळी तर्फे तळोजे, खानाव, मोहोदर, मोहपे, नितळस, सांगडे, शिवकर, वांगणी तर्फे तळोजे, वांगणी तर्फे वाजे या १७ ठिकाणची कामे १०० टक्के पूर्ण झाली असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली. तर आजीवली, भिंगारवाडी, सोमटणे, वडघर या ठिकाणी शून्य टक्के काम आहे. शून्य ते पंचवीस टक्के कामापैकी आदई येथील काम संथ गतीने सुरू आहे.

सोमटणे येथे फेरनिविदा काढण्यात येणार आहे. तर बोरले आणि शेडुंग येथे या योजनेची आवश्यकता नसल्याचे ग्रामपंचायतीने कळवल्यामुळे सदरची योजना रद्द साठी प्रस्तावित आहे. जलजीवन मिशन योजनेसाठी पडलेल्या खड्ड्यांमुळे गावातील रस्त्यांची पुरती वाट लागलेली आहे. येथील काम पूर्ण तर झाले नाहीच; शिवाय खड्ड्यांमुळे वाहनांनादेखील अडचण निर्माण झाली. कित्येक ठिकाणी अर्धवट कामे गेल्या काही वर्षांपासून सुरू आहेत. अतिशय संथ गतीने कामे सुरू असल्याने त्याचा फटका नागरिकांना बसत आहे. अनेकदा कंत्राटदार आणि ग्रामस्थांमध्ये वादाचे प्रसंग ओढवले आहेत.

बरेचशा गावांमध्ये केवळ साठवण टाकीचे, वितरण वाहिनीचे, ऊर्ध्व वाहिनी, गुरुत्ववाहिनीचे काम झालेले असून, सद्यः स्थितीत ५७ कामे बंद आहेत. तर काही ठिकाणी फेरनिविदा काढण्यात येणार आहेत. काही ठेकेदारांच्या कामाची मुदत संपलेली आहे. वेळेवर काम पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांना काळया यादीत टाकून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.



| योजनेची सद्यःस्थिती | किती कामे |
|---|---|
| ० ते २५ | ०९ |
| २५ ते ५० | २४ |
| ५० ते ७५ | ४० |
| ७५ ते ९५ | २५ |
| ९५ ते ९९ | १८ |
| १०० | १७ |
| एकूण | १३३ |

## अशोक ठमके सेवानिवृत्त

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा धाटाव औद्योगिक वसाहतीमधील अंशुल स्पेशॉलिटी मोलेक्युलस प्रायव्हेट लिमिटेड ह्या नामांकित कंपनीतील अशोक दामोदर ठमके वयाच्या ५८ व्या वर्षी वयोमानानुसार दि.३ जानेवारी रोजी कंपनीतून सन्मानाने सेवानिवृत्त झाले आहेत.

यावेळी कंपनीचे सी.ई.ओ. वरिष्ठ अधिकारी एस.आर. सातपुते, उपाध्यक्ष (ऑपरेशन) युनिट हेड एल.के. शिट्यालकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक यथोचित सन्मानपूर्वक सेवानिवृत्ती निरोप समारंभ संपन्न करण्यात आला. याप्रसंगी कंपनीचे पर्सनल मॅनेजर किशोर तावडे, श्रीयुत एकल, प्रोडक्शन हेड व्ही.एम.खुस्पे, स्टोअर अँड वेअरहाऊस हेमंत मोहिते आदी उपस्थित होते.

## तहसील कार्यालयातील पाणपोईची दुरवस्था



### देखभालीकडे दुर्लक्ष; नागरिकांचे पाण्यावाचून हाल

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील तहसील कार्यालयाच्या आवारात बसवण्यात आलेली पाणपोई गेल्या अनेक महिन्यांपासून बंद आहे. संबंधित प्रशासनाचे या पाणपोईच्या देखभालीकडे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी, संपूर्ण तालुक्यातून तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचे पाण्यावाचून हाल होत आहेत.

तहसील कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना पाणी उपलब्ध होण्यासाठी डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या सौजन्याने ही सुसज्ज व मोठी पाणपोई बनवण्यात आली होती. पाणपोई बंद असल्यामुळे तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना पाण्यासाठी वीस रुपयांची पाण्याची बाटली घेऊन तहान भागवावी लागत आहे.

# दत्तात्रेय म्हात्रे पत्रकारभूषण पुरस्काराने सन्मानित

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पत्रकार दत्तात्रेय अनंत म्हात्रे यांना शनिवारी (दि.२८) नवी मुंबई येथील पारस काव्य कला जनजागृती संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या यंदाच्या राज्यस्तरीय पत्रकारभूषण पुरस्काराने समारंभपूर्वक मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले असून, त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



गेली २८ वर्षे लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेत ते बोलत आहेत. त्यांची पत्रकारिता मातीशी नाते सांगणारी वस्तुनिष्ठ प्रकारची आहे. आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्नांची उकल केली. एसईझेड, पर्यावरण, शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न, कॉरिडोर, तिसरी मुंबई, आदिवासींचे प्रश्न, महापूर हे प्रश्न त्यांनी वर्तमानपत्रातून मांडलेच; परंतु कृषीवलमधून प्रासंगिक लेख तसेच मोहोर व कलासक्त या पुरवणीतूनदेखील त्यांनी लेखन केले आहे.

त्यांचा पत्रकारितेतील हा प्रवास सतत प्रवाहित राहावा, अशा अभिनंदनपूर्वक शुभेच्छा उद्योगपती राजेंद्र खारपाटील, सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच सचिन घबाडी, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल, माजी प्राचार्य डी.बी. पाटील, पारस काव्य कला जनजागृतीचे अध्यक्ष मंगेश चांदिवडे, कवी पुंडलिक म्हात्रे, पत्रकार मधुकर ठाकूर, प्रदीप पाटील, जगदीश तांडेल, दिनेश पवार, रूपाली वाघमारे, ज्येष्ठ दिग्दर्शक वसंत चिर्ले कर, दिग्दर्शक प्रमोद पाटील, रंगकर्मी विजय पाटील, नाटककार धनेश्वर म्हात्रे, नाटककार हसूराम पाटील, रंगकर्मी आनंद चिर्लेकर, अशोक म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, रमेश फोफेरकर, किशोर भगत, संतोष ठाकूर, मीनल माळी, वैशाली मोहिते परेशा सरोदे, रुचिता म्हात्रे, के.बी. ठाकूर, अस्मित ठाकूर, गोवर्धन पाटील, हरिश्चंद्र गोंधळी, संदेश चौलकर या सर्वांनी दिल्या. दरम्यान, दत्तात्रेय म्हात्रे यांचे पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# चोरढे शाळेची अविस्मरणीय सहल

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद शाळा चोरढे मराठी शाळेची शैक्षणिक सहल इयत्ता पाचवी ते सातवीच्या ४१ विद्यार्थ्यांची सहल मुंबई दर्शन येथे गेलेली होती. याबाबत पालकांचे मोठ्या प्रमाणावर सहकार्य लाभले. सकाळी साडेपाचला निघाल्यावर सि लिंकद्वारे मुलांनी आनंद लुटला. प्रथम गेटवे ऑफ इंडिया, मुंबईचे प्रवेशद्वार, ताज हॉटेल आदी बाबींची विद्यार्थ्यांना माहिती दिली. यानंतर गेटवे ऑफ इंडियाजवळीलच वस्तुसंग्रहालयात विद्यार्थ्यांना नेण्यात आले.



वस्तुसंग्रहालयात विविध प्राणी, पक्षी यांचे चित्रे शिल्पे, ढाल, भाले, तलवार इत्यादी बाबींची मुलांनी प्रत्यक्ष पाहून माहिती घेतली. नेहरू तारांगणात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पृथ्वी कशी तयार झाली, आकाशातील नक्षत्र, तारे, तारका समूह इत्यादी बाबीची पडद्यावर शोद्वारे माहिती झाली. सुमारे एक तास झालेल्या या चित्रपटात विद्यार्थ्यांना विज्ञानाची बरीचशी ओळख निर्माण झाली. सुरुवातीला सूर्यमाला व इतर बाबींची माहिती विद्यार्थ्यांना एकत्र बसून देण्यात आली. यावेळी आपल्या मुरुड तालुक्यातील आदर्श शाळा मजगाव येथील विद्यार्थी व शिक्षकवृंद सोबत होते.

मत्स्यालय पाहायला गेल्यानंतर तेथे काम चालू असल्याने आत प्रवेश मिळाला नाही. परंतु, यानंतर विद्यार्थ्यांना भायखळा येथील राणीच्या बागेत देण्यात आले. राणीच्या बागेत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अस्वल, वाघ, रानगेडा, पाणघोडा, हिरवे राखाडी पोपट, पेंग्विन, मोर इत्यादी प्राणी पक्षी प्रत्यक्ष पाहिले. शाळेच्या अध्यक्षा सुकन्या दुकले यांनी दिलेले भेळीच्या साहित्याने विद्यार्थ्यांसाठी भेळ बनवून देण्यात आली. मध्येच मॉलला थांबवून विद्यार्थ्यांना खरेदीचा आनंद लुटू दिला. अशाप्रकारे शाळा चोरढे मराठीची शैक्षणिक सहल अतिशय आनंदी व प्रसन्न वातावरणात पार पडली. सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय व्यवस्थित शिस्त व आनंदाचे दर्शन घडवले. सहलीसाठी लगेच परवानगी देणारे तालुका गटशिक्षणाधिकारी श्री. गवळी व सहल यशस्वी करण्यासाठी मदत करणारे सर्व शिक्षक वृंद, सर्व पालक, सर्व विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती व सर्वांचे पालकांनी आभार मानले.

## प्रीतम म्हात्रेंच्या हस्ते शिवमंदिराचे भूमीपूजन

**। उरण । वार्ताहर ।**

केळवणे येथील शिवभक्त घनशाम रघुनाथ पाटील यांच्या माध्यमातून शिवमंदिराची निर्मिती केली जात आहे. शिवमंदिराचे भूमीपूजन केळवणे कोळीवाडा येथे पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम जे.एम. म्हात्रे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी विभागातील शिवभक्त आणि ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

मंदिराची निर्मिती करून पाटील कुटुंबियांनी आजूबाजूच्या सर्व गावातील ग्रामस्थ आणि शिवभक्तांना एक चांगले अध्यात्मिक विचार देण्यासाठी पुढाकार घेतला आहे, त्याबद्दल संपूर्ण पाटील कुटुंबियांचे मनापासून आभार मानण्यात आले.

## शिवस्मारकाचा सुवर्ण महोत्सवी वर्धापनदिन



**। चाणजे । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील गोवठणे गावात १९७४साली उभारण्यात आलेल्या शिवस्मारकाचा सुवर्ण महोत्सवी वर्धापनदिन शिवस्मारक समितीतर्फे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या स्मारकाचे उद्घाटन लोकनेते दि.बा. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते.

विशेष म्हणजे, पन्नास वर्षांपूर्वी गोवठणे गावात रस्ते नव्हते, पाण्याची तीव्र टंचाई असायची, गावात साधी बैलगाडी येत नव्हती. अशा दुर्गम गावात १९७४ साली प.शि.म्हात्रे, किसन पाटील, मो.बा. वर्तक, सो.सु. म्हात्रे, अ.बा. वर्तक, व.रा. म्हात्रे, रा.ना.म्हात्रे, ए.ना. गावंड, म.शि. म्हात्रे, रा.उ. म्हात्रे या प्राथमिक शिक्षकानी कांस्य धातुचा शिवपुतळा उभारून शिवस्मारक निर्माण केले. विशेष म्हणजे, गोवठणे गावात उभारण्यात आलेला शिवपुतळा शिवस्मारक हे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण दुर्गम भागातील पहिले शिवस्मारक आहे.

पान १ वरून

## निष्ठावंत कार्यकर्त्याला मुकलो

झाली की नाही याची ते घरात जाऊन चौकशी करुन मदतकार्य करत असत. यावेळी मॉर्निंग वॉक ग्रुप, ज्येष्ठ नागरिक ग्रामस्थ कुसुंबळे, नवरात्र उत्सव मंडळ, भजन मंडळ कुसुंबळे, आदींनी स्व. ठाकूर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

स्व. प्रमोद ठाकूर यांनी गेल्या अनेक वर्षे शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून कार्य केले. त्यांनी सदस्य, सरपंच, सभापती अशा पदांवर काम केले. अत्यंत हुशार, प्रामाणिक, सदा मितभाषी असा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी सामाजिक, क्रीडा, राजकीय अशा अनेक क्षेत्रात चांगली कामगिरी केली. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे खजिनदार म्हणून कार्यरत होते. ग्रुप ग्रामपंचायत कुसुंबळे सरपंचपदावर २० वर्षे विराजमान होऊन गावातील अनेक सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आदी क्षेत्रात नावीन्यपूर्ण कामगिरी बजावून समाजाचे हित साधल्याचे उपस्थितांनी आपल्या भाषणातून नमूद करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## ‘स्वच्छ मिशन’ला हरताळ

व्यवस्थापन करण्याची सवय राहवी, यासाठी स्वच्छ भारत अभियानांतर्गत कंपोस्ट खड्डे तयार करण्याबाबत ग्रामपंचायतींना आवाहन केले. त्या आवाहनाला ग्रामपंचायतींकडून प्रतिसाद मिळाला. कंपोस्ट खड्डे तयार करण्यासाठी स्वच्छ भारत अभियनामार्फत ७० टक्के व ग्रामपंचायतींच्या १५ वित्त आयोगातून ३० टक्के असा निधी खर्च करण्याची तरतूद करण्यात आली. जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी कंपोस्ट खड्डे तयार करण्यात आले. रस्त्याच्या दुतर्फासह काही मोकळ्या जागेतही कंपोस्ट खड्डे तथा पीट बांधण्यात आले. आठ ते दहा फूट खोल व सहा फूट लांब, चार फूट लांब अशा या कंपोस्ट खड्ड्याची आखणी होती. परंतु, या कंपोस्ट खड्ड्यातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास ग्रामपंचायती उदासीन ठरल्याने त्याठिकाणी कचऱ्याचा ढिगारा तयार झाला.

आता मात्र जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतीमधील गावांच्या वेशीवर, रस्त्याच्या दुतर्फा प्लास्टिक व इतर कचरा अस्ताव्यस्त पडून आहे. रस्त्यावरून येणाऱ्या प्रवाशांना नाक दाबून प्रवास करावा लागत आहे. या कचऱ्याच्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे. त्यामुळे कुत्र्यांचा उपद्रवही वाढला आहे. कुत्र्यांकडून हल्ला होण्याबरोबरच दुचाकीचा अपघातही होत असल्याची भीती निर्माण झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील ठिकठिकाणच्या रस्त्यांवर, गावांच्या वेशीवर कचऱ्यांचा ढिगारा दिसून येत आहे. या कचऱ्यामुळे मानवी आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कंपोस्ट खड्ड्याच्या उपक्रमाला धाब्यावर बसवत अनेक ठिकाणी कचरा टाकला जातो. त्यामुळे स्वच्छ भारत अभियानाला हरताळ फासण्याचे काम गावपातळीवर होत आहे. याकडे जिल्हा परिषद विभाग गांभीर्याने लक्ष देईल का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## अखेर ‘तो’ टॉवर हटवला

मोठ्या प्रमाणावर बसून नुकसान झाले होते. येथील तहसील कार्यालयानजीक वनविभागाच्या वायरलेस टॉवर कोसळला होता. हा टॉवर हटविण्यासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते जनार्दन कंधारे, समाज सेवकांकडून मागणी करण्यात आली होती. पावसाळ्यात याठिकाणी कोणती एखादी दुर्घटना घडली तर याला जबाबदार कोण, असा सवालही नागरिकांतून विचारला जात आहे.

तालुक्यातील महत्त्वाचा दुवा असलेली तहसील कार्यालय, वनविभाग, ट्रेझरी, सेतु, मंडळ व तलाठी कार्यालय येथे असून, नेहमी गजबजलेली असतात. दूरवरुन ग्रामीण भागातून आलेल्या लोकांची आपल्या कामासाठी लगबग असते. निसर्ग चक्रीवादळ होऊन चार वर्षे होऊनही या पडलेल्या टॉवरकडे शासनाच्या संबंधित विभागाचे दुर्लक्ष दिसून येत होते. याठिकाणी वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन, तातडीने दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत होती. अखेर चार वर्षांनंतर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे यांच्या पाठपुराव्यानंतर हा पडलेला टॉवर हटविण्यात आला.

## मातृवंदना अनुदानापासून महिला उपेक्षित

४,८३४ फॉर्म ऑनलाइन पूर्ण केले आहेत. कर्जत तालुक्यात मातृवंदना अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या महिलांची संख्या ५३९२ असल्याचे कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. कर्जत तालुक्यात नाही तर, देशात या योजनेचे सर्वर फेब २०२३ मध्ये बंद झाले ते नॉव्हेंबर २०२३ मध्ये पुन्हा सुरु झाले. त्यामुळे त्या नऊ महिन्यांत कोणत्याही अर्जदाराचे अर्ज संपूर्ण देशात ऑनलाईन होऊ शकले नव्हते.

आशा सेविकांकडे रजिस्टरची पूर्ण माहिती तालुका आरोग्य खात्याकडून अजूनपर्यंत दिली नसल्याने हा आकडा अजून वाढण्याची शक्यता आहे. मात्र, ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पोर्टलची समस्या आहे. त्यात कोणत्याही विभागातील अधिकारी तसेच कर्मचारी यांचा हस्तक्षेप नसतो. शासनाचे पोर्टल काम करीत नसल्याने केवळ कर्जत तालुक्यात नाहीतर राज्यातही संशय कायम आहे. सर्व अर्जदार माता यांना प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचा लाभ देण्याचा प्रयत्न आरोग्य विभागाचा आहे, अशी माहिती खुद्द रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे यांच्या कार्यलयाकडून देण्यात आली आहे.

मात्र, आता लाडकी बहीण योजनेच्या निमित्ताने महिलावर्गाने मोठ्या प्रमाणात आपले आधार कार्ड आपल्या बँकेतील खात्याला लिंक करून घेतले आहेत. त्याचा दुसरा परिणाम मातृवंदना योजनेतील लाभार्थी यांचे ऑनलाईन होऊ शकले नसलेले अर्ज आता यशस्वीरित्या ऑनलाईन होऊ लागले असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगितले जात आहे. त्यामुळे मातृवंदना योजनेचे अनुदान अनेक लाभार्थी यांना मिळू लागले असल्याचे दिसून आले आहे.

## एसपीआर फार्मा कंपनीला आग

झाल्याचे समजते. यावेळी आग आटोक्यात आणण्यासाठी पाताळगंगा अग्निशमन दल, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनी, खोपोली नगरपालिका यांच्यासह एकूण सहा अग्निशमन बंबाच्या जवानांनी प्रयत्न केले. जीवितहानी झाली नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

साडेतीन तासांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. घटनास्थळी तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर यांनी घटनास्थळाला भेट दिली. रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्यासह पोलीस घटनास्थळी उपस्थित होते.

## मरणानंतरही यातना सुटेनात!

गवत वाढलेले असून, अंत्यसंस्कार करण्यात येणाऱ्या जागेवर साधी शेडदेखील उभारण्यात आलेली नाही. यामुळे अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांना भरउन्हात अंत्यविधी उरकावा लागतो. तसेच हीच परिस्थिती पावसाळ्यात राहिली तर भरपावसात अंत्यविधी करणे शक्य होणार नाही, त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने सार्वजनिक स्मशानभूमीच्या दुरवस्थेकडे प्राधान्याने लक्ष देऊन सुसज्ज अशी स्मशानभूमी उभारावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## कोकणासाठी ‘गोळेगणी पॅटर्न’ वरदान

मध्ये पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी या टंचाईग्रस्त गावामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गावातील शेतकऱ्यांनी आंबा व काजू या फळपिकांची लागवड केली. लागवड केलेल्या कलमांना डिसेंबर ते मे या कालावधीत संरक्षित पाणी देण्याकरीता कृषी सहाय्यक मनोज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली नामदेव येरुणकर यांच्या शेतामध्ये ५ मी. लांब ५ मी. रूंद आणि २ मी. खोल अशा आकारमानाचे १:०.५० उताराच्या जलकुंडाचे खोदकाम केले व त्याला ५०० मायक्रॉन जाडीचे प्लास्टिक अस्तरीकरण करुन ५२ हजार ७३१ लीटर संरक्षित पाणीसाठा करण्यात आला. जलकुंडात उपलब्ध झालेले पाणी लागवड केलेल्या कलमांना संरक्षित पाणी म्हणून वापर केल्याने कलमे जगण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले.

यानंतर टंचाईग्रस्त गोळेगणी या गावामध्ये विभागीय कृषी सहसंचालक कोकण विभाग ठाणे अंकुश माने यांच्या मार्गदर्शनाखाली व तत्कालीन क्षेत्रीय अधिकारी जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले, उपविभागीय कृषी अधिकारी महाड बालाजी ताटे, तत्कालीन तालुका कृषी अधिकारी पोलादपूर सूरज पाटील, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहायक देवपूर मनोज जाधव यांच्या तांत्रिक मार्गदर्शन व जनजागृतीमुळे गोळेगणी गावातील नामदेव येरुणकर, गणपत पवार, शेखर येरुणकर, अविनाश येरुणकर, प्रकाश येरुणकर, दीपक मोरे, ज्ञानेश्वर मोरे, राजेंद्र दळवी, अनिकेत मोरे, सागर मोरे, विमल मोरे, मंदा सुर्वे, मधुकर मोरे, बाळकृष्ण मोरे, दशरथ मोरे, दीपक मोरे, नितीन मोरे, दिपक कदम, रामदास मोरे, तुटवली गणेश मोरे, राजाराम शिंदे, मोरगिरी, दगडू ढेबे, मोरगिरी या शेतकऱ्यांच्या स्वयंप्रेरणेने २२ जलकुंडांचे काम पूर्ण करण्यात आले. या जलकुंडांच्या कामाला पत्रकार शैलेश पालकर यांनी सातत्याने तसेच वेळोवेळी प्रसिध्दी देऊन शेतकऱ्यांना प्रेरणा दिली. याकामी देवेंद्र दरेकर तसेच प्रकाश कदम या पत्रकारांनीही प्रसिध्दी दिली.

कोकणातील जमीनधारणा क्षेत्र सरासरी १ हेक्टरपेक्षा कमी आहे. कोकण विभागात सरासरी पर्जन्यमान ३५०० ते ४००० मि.मी. असून, कोकण विभागातील हवामान आंबा, काजू व इतर फळपिकास पोषक आहे. कोकण विभागात दरवर्षी विविध शासकीय योजना, सामाजिक संस्था तसेच वैयक्तिक शेतकरी यांच्याकडून आंबा व काजू या फळपिकांची लागवड मोठ्य प्रमाणात करण्यात येत असून, फळबागा जिवंत राहण्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. याचे प्रमुख कारण म्हणजे, कोकणातील जमिनी डोंगर उताराच्या व कातळ भाग असल्यामुळे लागवडीनंतर सुरुवातीच्या तीन वर्षांच्या कलमे रोपांना डिसेंबर ते मे या महिन्यांच्या कालावधीत संरक्षित पाणी देण्याची सुविधा पुरेशा नसल्याचे दिसून येते.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांनी कोकणातील फलोत्पादन पिकासाठी जलकुंड या उपचारास तांत्रिक शिफारस केलेली असून, या अनुषंगाने मा. संचालक, मृद व जलसंधारण यांच्याकडून शासनास सादर केलेल्या जलकुंड प्रस्तावास मृद व जलसंधारण विभागाच्या दि. २७ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कोकण विभागासाठी डोंगराळ भाग कातळामध्ये यंत्राद्वारे जलकुंडाचे काम करण्याचे मापदंड मंजूर केलेले आहेत.

**प्रोत्साहनाची आवश्यकता**

राज्य सरकारच्या कृषी आयुक्तालयाने याबाबतचे अधिकृत परिपत्रक दि.३ जानेवारी २०२५ रोजी जारी केले असल्याने कोकणातील पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाचही जिल्ह्यांमध्ये जलकुंडनिर्मितीस राज्य सरकारचे प्रोत्साहन मिळणार आहे. यासाठी जिल्हा नियोजन मंडळ, मनरेगा असे पर्याय उपलब्ध असून, जलकुंडनिर्मितीसाठी गोळेगणी गाव ज्यांच्या विधानसभा मतदारसंघामध्ये आहे; त्या रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी शेतकऱ्यांना रोहयोतून जलकुंडनिर्मितीसाठी भरघोस प्रोत्साहन दिल्यास शेतकऱ्यांचे कल्याण साधले जाणार आहे.


### जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे पाली तर्फे कोतल खलाटी, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री विष्णु रावजी देशमुख व श्री विलास विष्णु देशमुख रा-पाली तर्फे कोतल खलाटी, ता-कर्जत जि-रायगड यांची खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्रफळ हे. आर. चौ. मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| पाली तर्फे कोतल खलाटी. | ५० | ८ | ०.०३.३० | ०.०३ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री विष्णु रावजी देशमुख व श्री विलास विष्णु देशमुख यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे.

सबब वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ०७ दिवसाच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह हरकत दाखल करावी, वरील देण्यात आलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस सदरील मिळकतीचे मालक व आमचे आशिल हे जबाबदार राहणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

दिनांक :०६/०१/२०२५

**ॲड भारत अंकुश सांवत**
( बी कॉम. एल. एल. बी )
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रंमाक ९५५२२९६६२२

### जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे पाली तर्फे कोतल खलाटी, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री विष्णु रावजीराव देशमुख रा-पाली तर्फे कोतल खलाटी, ता-कर्जत जि-रायगड यांची खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| पाली तर्फे कोतल खलाटी. | ३७ | १ | ०.०७.६० | ०.०६ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री विष्णु रावजीराव देशमुख यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे.

सबब वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ०७ दिवसाच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह हरकत दाखल करावी, वरील देण्यात आलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस सदरील मिळकतीचे मालक व आमचे आशिल हे जबाबदार राहणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/०१/२०२५

**ॲड भारत अंकुश सांवत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रंमाक ९५५२२९६६२२

# निवडक



## ‘चेरी ब्लॉसम’ उपक्रमाला प्रतिसाद

**पनवेल :** एक भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, कवयित्री, भारतातील पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई ज्योतीराव फुले यांच्या जन्मदिनाचे दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल व पनवेल महानगर पालिका यांचे संयुक्त विद्यमाने ‘चेरी ब्लॉसम’ या रोटरी प्रकल्पा अंतर्गत के व्ही कन्या शाळेतील आठवी व नववीतील विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरासाठी रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे, पनवेल महानगर पालिका आरोग्य विभागाच्या डॉ. रेहाना मुजावर, के व्ही कन्या शाळा कमिटी चेअरमन प्रितम म्हात्रे, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे आरोग्य संचालक डॉ. लक्ष्मण आवटे, शाळेच्या मुख्याध्यापिका सुविद्या वाजेकर यांचे सह शाळेतील इतर शिक्षक वर्ग, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दीपक गडगे, खजिनदार ऋषिकेश बुवा यांचे सह माजी अध्यक्ष, रोटरी सदस्य, रोटरी एन्स यांची प्रमुख उपस्थिती होती. या हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचा ४३० विद्यार्थिनींनी लाभ घेतला.ज्यांचे हिमोग्लोबिन कमी होते त्यांना डॉ. गिरीश गुणे व डॉ. रेहाना मुजावर यांनी आहाराविषयी मार्गदर्शन केले. पनवेल महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाकडून मोफत औषधी गोळ्यांचे वाटप करण्यात आले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी विलेस्टा हेल्थकेअर प्रा. लि., फ्रँको फार्मासियूटीकल लप्रा. लि., ऍपेक्स लॅब. प्रा. लि. चे शिडीस विभाग व आयुषन फार्मासियुटकल्स प्रा. लि.आदी कंपनींचे योगदान मिळाले.



## दिनदर्शिकेचे प्रकाशन

**। पनवेल । वार्ताहर ।**

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ब्लू पँथरर्स संघटनेमार्फत निर्माण करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन पनवेल एसटी डेपो समोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन या ठिकाणी संपन्न झाले.

नवीन वर्षाच्या सुरुवातीला अनेक संस्था, संघटना, राजकीय पक्ष आपल्या नावाने दिनदर्शिका निर्माण करत असतात, आणि तमाम जनतेपर्यंत पोहोचवत असतात, ब्लू पँथरर्स संघटनेने पहिल्यांदाच नवीन वर्षासाठी अशा प्रकारच्या दिनदर्शिकेचे निर्माण केले आहे, त्याचे प्रकाशन संस्थेचे ज्येष्ठ, श्रेष्ठ पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच पनवेल मधील शासकीय कार्यालयामध्ये जाऊन त्या ठिकाणी देखील संबंधित मुख्य अधिकाऱ्याच्या हस्ते लोकार्पण करून कार्यालयांमध्ये कॅलेंडर लावण्यात आले उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी तसेच पनवेल शहर पोलीस स्टेशनचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते नरेंद्र गायकवाड, प्रवीण खंडागळे, कमलाकर कांबळे, संजय जाधव, जयवंत बाबरे, राजेश खंडागळे, विजय गायकवाड, कुणाल लोंढे, आनंद गायकवाड, नरेश कदम, नितीन कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते, दिनदर्शिका निर्माण करण्यासाठी राज सदावर्ते व प्रल्हाद गायकवाड यांनी मेहनत घेतली.

## पोलीस बीट निर्मितीची मागणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खांदेश्वर रेल्वे स्थानक व मानसरोवर रेल्वे स्थानक परिसरादरम्यान पोलीस ठाणे अंतर्गत बीट निर्माण करण्याची मागणी शिवसेनेचे कामोठे शहर संघटक संतोष गोळे यांनी केली आहे.खांदेश्वर रेल्वे स्थानक आणि मानसरोवर रेल्वे स्थानक परिसर दरम्यान होऊ घातलेल्या पंतप्रधान आवास योजनेच्या प्रांगणात रात्रीचा वेळी काळोख असतो दोन्हीही स्थानकाबाहेर त्यांत शांतता असते. पत्र्याची केलेली बंधिस्त जागेतून महिलांना रात्री आणि दुपारचा शांततेच्या वेळात जीव मुठीत धरून जावे लागते. पहाटे रेल्वे स्थानकाकडे जाणारा नोकरदार वर्ग पहाटेच्या लोकलसाठी महिला पुरुष वर्ग मार्गक्रमण करत असतात. पहाटे सोनसाखळी चोर यांकडून हल्ले करून लुटले गेले आहे. भुरटे चोर सोसायटीमध्ये होणारी घरफोडी, चेन खेचणे, मंगळसूत्र चोरी, मोबाईल खेचणारे मद्यपी यांच्या भीतीने भयभीत नागरिकांना सुटकेचा श्वास टाकता यावा यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे कामोठे शहराच्या वतीने बीट निर्माण करण्याची मागणी करण्यात आली आहे.


### तटरक्षक दल, भारतीय नौसेना, स्थानिक प्रशासनाचे सक्रिय योगदान


# महाराष्ट्रातील ६२ बेटांवर ध्वजारोहण

**। रायगड । प्रतिनिधी ।**

देशाच्या ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्रातील समुद्रकिनाऱ्यांवरील ६२ बेटांवर ध्वजारोहण केले जाणार आहे. हा ऐतिहासिक उपक्रम तटरक्षक दल, नौदल, मुंबई पोर्ट ट्रस्ट, सागरी महामंडळ स्थानिक प्रशासनाच्या मदतीने राबवला जाणार आहे. या उपक्रमाची तयारी सुरू झाली असल्याची माहिती सागरी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.







महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्याची लांबी सुमारे ७५० किमी आहे. हा किनारा भारताच्या पश्चिमी किनारपट्टीवर स्थित आहे. सुंदर समुद्रकिनारे, लहान-मोठी बेटे आणि ऐतिहासिक किल्ले आहेत. महाराष्ट्राचा सागरीकिनारा केवळ भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि आर्थिक दृष्टिकोनातूनदेखील अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. भारत सरकारने यापूर्वी हर घर तिरंगा उपक्रम राबवला होता. एकता, अखंडता आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देशभर पोहोचवण्यासाठी २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्रातील ६२ बेटांवर ध्वजारोहण करण्यात येईल.

ध्वजारोहणाच्या तयारीच्या दृष्टीने स्थानिक प्रशासन आणि संबंधित विभागांनी तयारी सुरू केली आहे. बेटांवर सफाई आणि सुरक्षा तपासणी करण्याच्या कामांना गती दिली आहे. यामध्ये सर्व बेटांवर आवश्यक ध्वजारोहणाची तयारी केली जात असल्याची माहिती सागरी महामंडळाकडून देण्यात आली आहे. अभिमान जागरूक हा उपक्रम महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यांवरील बेटांची महत्त्वाची जाणीव करण्यासाठी एक आदर्श ठरेल. त्याचबरोबर या उपक्रमामुळे लोकांमध्ये राष्ट्रीय एकतेचा, भारतीय संस्कृतीचा आणि भारताच्या महासागरी सीमांचा अभिमान जागरूक होणार आहे.

**महाराष्ट्रातील सागरी बेटे**

एलिफंटा बेट (घारापुरी)–मुंबई,
सिंधुदुर्ग किल्ला (सिंधुदुर्ग बेट) – सिंधुदुर्ग,
खांदेरी बेट (कांजा बेट) – मुंबई,
उंदेरी बेट – मुंबई,
मुरुड–जंजिरा बेट – रायगड,
निवती बेट – सिंधुदुर्ग,
तारकर्ली बेट – सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्ग बेट – सिंधुदुर्ग,
द्वारका बेट –रत्नागिरी,
उरण बेट – रायगड,
मालवणी बेट, दाभोळ बेट

## तळा येथे विद्यार्थी संवाद कार्यशाळा

**। तळा । वार्ताहर ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे, द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील मकरिअर कट्टाफ विभागाअंतर्गत महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणारा करिअर कट्टा या अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आभासी पद्धतीने विद्यार्थी संवाद कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेत करिअर कट्टा विभागातील ४६ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच प्राध्यापक वर्ग व कार्यालयीन कर्मचारी देखील उपस्थित होते. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. सोनम पवार यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक करिअर कट्टा विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. राजाराम महादेव थोरात यांनी केले.

विद्यार्थी संवाद कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे व व्याख्याते डॉ. बबन शिनगारे आणि डॉ. हनुमंत जगताप यांचा परिचय व स्वागत डॉ. भगवान लोखंडे यांनी केले. विद्यार्थी संवाद कार्यशाळेमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व करिअर तसेच विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी या विषयावर डॉ. बबन शिनगारे आणि डॉ. हनुमंत जगताप, रायगड जिल्हा करिअर कट्टा समन्वयक यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) तसेच तत्सम परीक्षेच्या संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात स्वतःच्या विकासासाठी अनेक संधी उपलब्ध असतात याची जाणीव करून दिली. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. राजाराम थोरात यांनी केले.

## लोकलच्या धडकेत अज्ञाताचा मृत्यू

**पनवेल :** खारघर रेल्वे स्थानकाजवळ लोकल गाडीची ठोकर लागून गंभीर जखमी झालेल्या अज्ञात इसमाचा मृत्यू झाला आहे. मृत इसमाची उंची साडेपाच फुट असून, काळ्या व निळ्या रंगाचा फुल बाह्यांचा हिरव्या रंगाचा कॉलर असलेला टी शर्ट व नेसणीस निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट असे कपडे त्याच्या अंगावर आहेत. उजव्या खुब्याचे बाजूस जुने ऑपरेशन झालेले निशाण ओळख चिन्ह आहे. इसमाच्या वारसाचा शोध लागल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नवी मुंबईत पोलीस रेझिंग-डे सप्ताह



**। पनवेल । वार्ताहर ।**

पोलीस स्थापना दिनाच्या औचित्याने पोलीस रेझिंग-डे सप्ताह साजरा करण्यात येत असून त्याअंतर्गत आज पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल येथे नवी मुंबई पोलीस वाद्य-वृंद पथकाच्या वतीने गीत वादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाच्या वेळी वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी तसेच समाजातील विविध घटकाचे प्रतिष्ठीत नागरिक व पनवेलकर उपस्थित होते व त्यांनी या वाद्य वृंद पथकाने सादरीकरण केलेल्या गीत वादनाच्या कार्यक्रमाचे कौतुक केले.

## बियरच्या बाटलीने गालावर फटका मारून केली दुखापत

**। पनवेल । वार्ताहर ।**

घरी जाण्यावरून झालेल्या वादातून बियरच्या बाटलीने गालावर फटका मारून ३७ वर्षीय तरुणाला जखमी केल्याप्रकरणी शशांक जितेंद्र कासले (राहणार कामोठे, सेक्टर २१) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तुषार खंडाळे हा सेक्टर २० कामोठे येथे राहत असून तो आणि त्याचा मित्र शशांक हे बिअर शॉपीमध्ये मद्य प्यायले. त्यानंतर तुषार घरी जाण्यासाठी निघाला असता आणखी मद्य पिण्यासाठी शशांक आग्रह करत होता. यावेळी तुषार घरी जाण्यास निघाला मात्र शशांक विरोध करत होता. यावेळी त्यांच्यात वाद विवाद झाले आणि भांडण चालू झाले. शिवीगाळ आणि दमदाटी करून हाताने मारहाण केली. यावेळी शशांकने बियरच्या बाटलीचा फटका तुषारच्या गालावर मारला. त्यामुळे गालातून रक्त येऊ लागले. त्यांना दवाखान्यात दाखल करण्यात आले. याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## स्नेहसंमेलनातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यामधील माऊंट कार्मेल हायस्कूल कोर्लईचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्सहात संपन्न झाले. वार्षिक स्नेहसंमेलनाचा विषय जनजगृती करणारा होता. मनुष्याला आज पर्यावरण समतोल राखणे खूप आवश्यक आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये, यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. यासाठी हायस्कूलने आपल्या वार्षिक स्नेहसंमेलनात पर्यावरणाची जनजागृती करण्यासाठी लोकप्रबोधनपर गाणी व त्यावरील नृत्य पर्यावरण विषयक ठेवण्यात आली होती.



वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन रेव्ह फादर नॉरबर्ट डिसोझा व हायस्कूलचे चेअरमन रेव्ह.फादर बोनाव्हेंचर नुनीस यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी कोर्लई ग्रामपंचायत सरपंच राजश्री मिसाळ, माऊंट कार्मेल हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर ज्युली चांदी, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुनील वेगस, माजी विद्यार्थिनी मनस्वी वाडकर, स्कूल मधील सर्व सिस्टर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना रेव्ह फा. नॉरबर्ट डिसोझा यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पर्यावरण आधारित संदेश पर नृत्य व नाटिका यांचे विशेष कौतुक केले. अध्यक्ष रेव्ह फा. बोनवेंचर यांनी वर्तमानकाळात आपण पशु, पक्षी, वृक्ष या सर्व पर्यावरणातील घटकावर प्रेम केले पाहिजे. जसे आपण आपसातील संबंध जोपसत असतो त्याचप्रमाणे निसर्गावर सुद्धा प्रेम करून वनसंपदा वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असा मोलाचा संदेश दिला.

या वार्षिक स्नेहसंमेलनात इयत्ता पहिली ते दहावीमधील सर्व शालेय विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, नाटिका, गाणी, वाद्यवादन असे विविध प्रकार सादर केले. इयत्ता दहावीमधील विद्यार्थ्यांनी एक उत्कृष्ट पर्यावरण विषयक नाटिका सादर करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

## सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**। उरण । वार्ताहर ।**

उरण महिला सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्था अंतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.



२०२४ मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त संस्थेअंतर्गत उरणच्या महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्याकरिता मी उद्योजिका उरणची हा व्हाट्सअ‍ॅप ग्रुप महिलांसाठी सुरू करण्यात आला होता.

उरणमधील अनेक महिला उद्योजिकांनी या ग्रुपमध्ये आपले लघुउद्योग, गृह उद्योग यांचे प्रमोशन केले व नक्कीच त्यातून त्यांना ग्राहक मिळण्यासाठी मदत झाली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त संस्थेने स्थापित केलेल्या मी उद्योजिका उरणची या व्हाट्सअप ग्रुपच्या वर्धापनदिनी उरणमधील उद्योजिका महिलांचे सन्मानपत्र देऊन कौतुक करण्यात आले.


सदर कार्यक्रमासाठी उरण पोलीस स्टेशनच्या पीएसआय पद्मजा पाटील गोपनीय शाखेच्या पोलीस अधिकारी मानसी तांबोळी आणि पोलीस हवालदार यांची टीम उपस्थित होती.

सदर कार्यक्रमात संस्था उपाध्यक्ष कल्याणी दूखंडे , सीमा घरत, गौरी मंत्री, अफशा मुकरी, दीपा मुकादम, जोस्ना येरुनकर, नाहिदा ठाकूर, प्रगती दळी, उपक्रम कार्यकारिणी नीलिमा थळी, स्मिता पाटील, उरणच्या उद्योजिका विदूला कुलकर्णी, पूनम पाटेकर आदी पदाधिकारी उपस्थित होत्या.

## महाड अपघातातील मृतांच्या वारसांना मदत

**महाड :** मुंबई-गोवा महामार्गावरील वीर रेल्वे स्टेशनजवळ टोईंग व्हॅनने जीपला धडक दिली होती. या अपघातातील महाडमधील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पाच लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. वीर स्थानकाजवळ झालेल्या अपघातात महाड तालुक्यातील चौघांचा मृत्यू झाला होता. त्यानुसार मयत व्यक्तीच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पाच लाखांची मदत केली जाणार असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

## लोणेरेत होणार राज्य आंतर विद्यापीठ आविष्कार स्पर्धा!



**। माणगाव । वार्ताहर ।**

महामहीम राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांचे कार्यालयामार्फत महाराष्ट्र राज्य आंतर-विद्यापीठ आविष्कार स्पर्धा २०२५ चे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड येथे दिनांक १२ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान करण्यात येणार आहे. अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली.

आविष्कार ही राज्यव्यापी आंतर-विद्यापीठ संशोधनावर आधारित स्पर्धा असून या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील एकूण २६ विद्यापीठांचा समावेश आहे. या कार्यक्रमासाठी एकूण १००० पेक्षा अधिक नवकल्पक विद्यार्थी व २०० पेक्षा अधिक विद्यापीठ प्रशिक्षक सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा सहा वेगवेगळया श्रेणींमध्ये आयोजित केली जाणार आहे. मानवता भाषा आणि ललितकथा, वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा, शुद्ध विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, औषधे आणि फार्मसी, कृषी आणि पशुसंवर्धन आविष्कार या स्पर्धेसाठी राज्यपाल कार्यालय राजभवन यांनी नियुक्त केलल्या निरीक्षण समितीच्या मार्गदर्शनाखाली दहा निरीक्षक निवडलेले असतात तसेच राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञ, संशोधक व इतर मान्यवर यांचा परीक्षक म्हणून सहभाग असतो. विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल प्राध्यापक डॉ. कारभारी काळे, यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजनाची तयारी सुरु आहे.

आविष्कार ही स्पर्धा राजभवन कार्यालयातून २००६-०७ शैक्षणिक वर्षापासून सुरू झाली असून, या स्पर्धेचा मूळ उद्देश विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना करणे, तसेच विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्राथमिक संधी उपलब्ध करून देणे त्याचबरोबर त्यांच्यामध्ये स्पर्धात्मकता निर्माण करणे हे आहेत. विद्यार्थ्यांच्या संशोधनाला चालना देवून त्यांना प्रोत्साहन मिळविण्यासाठी शिष्यवृत्तीचा देखील समावेश आहे.

### उरणमध्ये इतिहासाच्या पाऊलखुणा | वैष्णव परंपरेचा इतिहास जतन करण्याची मागणी

# अकराव्या शतकातील विरगळीच्या संवर्धनाची गरज

**। उरण । प्रतिनिधी ।**

मुंबईपासून अवघ्या दोन तासांवर असणाऱ्या उरण तालुक्यातील पिरकोन, जासई, पुनाडे, आवरे गावात इतिहासाच्या पाऊलखुणा वीरगळीच्या रूपात आढळून येत आहेत. जवळपास हजार वर्षे जुन्या वीरगळ या गावातील डोंगर व मंदिर परिसरात दिसून येत आहेत. अकराव्या शतकातील इतिहास नष्ट होता कामा नये, याकरिता वीरगळींचे संवर्धन होणे फार गरजेचे असल्याचे इतिहासकारांकडून सांगण्यात येत आहे. शैव आणि वैष्णव या दोन्ही परंपरांचे एकत्रिकरण उरण तालुक्यात पाहायला मिळते आहे.



तालुक्यातील पिरकोन येथे वीरगळी तर चिरनेर-रानसई येथे गद्यगळी मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. पिरकोन गावात निसर्गाच्या सानिध्यात असणाऱ्या लोकवस्तीपासून दूर असलेल्या मंदिरांची झीज होऊन येथील दोन दगडी नंदी आजही मात्र सुस्थितीत असल्याचे दिसून येत आहेत. या मंदिराच्या चौथऱ्याखाली उतरल्यावर दोन शिळा आधाराने ठेवलेल्या दिसतात. पूर्वी यवनांची हिंदू मंदिरांवर आक्रमणे होत. त्यामुळे मंदिर परिसरातील शिवलिंग व नंदी जमिनीखाली गाडले होते. त्याचे उत्खनन केल्यानंतर मंदिर परिसरात शिवलिंग व नंदी आढळल्याने या जागेत शिवमंदिर बांधण्यात आले आहे. अशीच भग्न शिळा समोरील बोडणीच्या (छोटा तलाव) कडेला ठेवल्याचेही आढळून येते. अनेक शतकांपासून ऊन, वारा, पावसाचा मारा सहन करीत या शिळा मंदिराबाहेर पडून आहेत.

येथील ‘सतीशिळा’ किंवा ‘सतीचा दगड’ लक्ष वेधून घेतो. सतीशिळा किंवा सतीचे दगड यावर एकच चित्र कोरलेले असते. त्रिकोणी माथा असलेल्या सपाट दगडावर काटकोनात दुमडलेला हाताचा कोपरा आणि हाताचा पंजा दाखवलेला असतो. दंडावर नक्षीदार चोळी, मनगटापर्यंत चुडा भरलेला हात आणि बाजूला दोन मानवी आकृत्या असतात. या शिळेचा अर्थ असा, की ज्या घोडेस्वाराने युद्धात वीरमरण पत्करले आहे त्याच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी त्याच्यासोबत सती गेलेली आहे. एका वीरपत्नीचे हे स्मारक आहे. याच वीरगळांसमोरील भागात आणखी एक वीरगळ भग्नावस्थेत पडून आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# मंदिर वहीं बनायेंगे-२

हिंदी सिनेमांमध्ये यशस्वी सिनेमांचे पुढचे पुढचे भाग काढण्याची फॅशन सुरु आहे. पुष्पा किंवा सिंघम भाग दोन असे नाव दिले जाते. त्याच धर्तीवर भाजपने मंदिराच्या राजकारणाचा दुसरा भाग सुरू केला आहे. बाबरी मशीद पाडली तेव्हा मंदिर वही बनायेंगे अशी घोषणा देण्यात आली होती. आता त्या 'बनायेंगे'चा भाग दोन आला आहे. पूर्वी भाजपवाले पुन्हा असे काही करणार नाहीत असे अनेक भाबड्या लोकांना वाटत होते. राममंदिर झाल्यावर मुस्लिम आक्रमकांनी केलेल्या अपमानांचा बदला घेऊन संपला असेल असाही त्यांचा समज होता. राममंदिराचे उद्घाटन झाल्यानंतर अवघ्या चार महिन्यात अयोध्या लोकसभा मतदारसंघात भाजपचा दारूण पराभव झाला होता. त्यामुळे भाजपचा हा मंदिरांचा सोस कमी होईल असा एक तर्क होता. पण उत्तर प्रदेशातील आदित्यनाथांच्या सरकारने हे सर्व समज आणि तर्क खोटे ठरवण्याचा चंग बांधला आहे. त्या राज्यात जुन्या मशिदी पाडून त्यांच्याखाली मंदिरे होती असे सिध्द करण्याची चढाओढच लागली आहे. मुगल राजवटीचे म्हणून जे जे असेल ते पाडून टाका अशी मोहिमच जणू उघडण्यात आली आहे. परवा आग्र्यामध्ये औरंगजेबाचा म्हणून मानला जाणारा व उत्तम स्थितीत असणारा एक महाल पाडण्याचा प्रयत्न झाला. वास्तविक ऐतिहासिक दृष्ट्या या महालाला मोठे महत्व असून तो पुरातत्व खात्याच्या अखत्यारीत आहे. पण तेथेही बुलडोझर चालवण्याचा प्रयत्न झाला. पण मशिदी व दर्गे यांचा विषय त्यांच्याहून गंभीर आहे. त्याच्या बातम्यांच्या आडून पूर्ण मुस्लिम समाजालाच जणू गुन्हेगार ठरवण्याचा प्रयत्न चालू आहे. यामध्ये संभळ नावाचे शहर सध्या बरेच चर्चेत आहे. संभळला अयोध्येच्या दिशेने नेण्याची पुरेपूर तयारी सुरू आहे. अयोध्येप्रमाणेच बाबराने तेथेही मंदिर पाडून त्याजागी शाही जामा मशीद उभारली असा संत मंडळींचा दावा आहे. विष्णूचा दहावा अवतार कल्की हा संभळमध्ये जन्माला येणार असल्याचा समज आहे. त्याचे पुराणातले दाखले देऊन एकदम हिंदूंच्या भावनांना हात घालण्यात आला आहे.

### संभळमधील गुंडगिरी

अयोध्येतील राममंदिर उद्धाटनासाठी सिद्ध होत असतानाच उत्तर प्रदेशात काशी आणि मथुरेतील मशिदींमध्ये भांडणे सुरू करण्यात आली. काशीमधील ग्यानवापी मशिदीत वर्षभर पुजेची परवानगी मिळावी असा अर्ज करण्यात आला. तेथील सर्वेक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात नेण्यात आला. त्यातून मग उत्तर प्रदेशात अशा वादांचे व सर्वेक्षणांचे एकदम पेवच फुटले. संभळमध्ये त्याचा कहर झाला. १९ नोव्हेंबरला तेथील स्थानिक न्यायालयात एक दावा दाखल करण्यात आला. न्यायालयानेही शाही मशिदीत तात्काळ सर्वेक्षणाचे आदेश दिले. लगोलग प्रशासनाने पहिले सर्वेक्षण केले. त्यात मंदिराचे अवशेष सापडले असे जाहीर केले. नंतर चार दिवसांनी दुसरे सर्वेक्षण झाले. त्यावेळी तेथे दंगल झाली. त्यात चार लोकांचा मृत्यू झाला. या दंगलीला मुस्लिमांना जबाबदार धरण्यात आले. आता दर दिवशी तेथे नवीन काहीतरी घडत आहे. संभळमधील मशिदी चोरून वीज घेत असल्याचा आरोप मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी केला आहे. त्यामुळे ते आता येथे बुलडोझर लावणार काय अशी भीती निर्माण झाली आहे. नुकतेच, मशिदीच्या समोरच एका पोलिस चौकीचे हिंदू धर्मशास्त्रानुसार, भूमिपूजन करण्यात आले. तिला सत्यव्रत पोलिस चौकी असे नाव देण्यात आले आहे. सत्यव्रत हे संभळचे पुराणातले नाव आहे. याखेरीज मशिदीला लागूनच इतर जागांमध्ये उत्खनन सुरू करण्यात आले आहे. तेथे पुरातन अवशेष सापडल्याच्या बातम्या प्रसिध्द होत आहेत. अयोध्येत हेच घडले होते. संभळचे हे लोण आता सर्व उत्तर प्रदेशात पसरत आहे. अमुक ठिकाणी मंदिर सापडले अशा बातम्या रोज येत आहेत. मुर्शिदाबाद, मोरादाबाद, अमेठी, जौनपूर, गाझियाबाद, मुजफ्फरनगर इत्यादी असंख्य ठिकाणी मशिदींच्या आसपास किंवा अन्यत्र कथितरीत्या 'मुस्लिमांमुळे बंद झालेली' मंदिरे सापडत आहेत. बुलंदशहरमध्ये तर शंकराचे मंदिर शोधून तिची पूजा तेथे बहुसंख्येने असलेल्या जाटव या दलित समाजाकडे सोपवण्यात आली आहे. जाटव ही दलितांमधील अत्यंत प्रभावी जात असून मायावती याच समाजाच्या आहेत. आरक्षण तसेच व्यवसायांमध्ये हा समाज इतरांहून पुढे आहे. त्याला आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्नही या निमित्ताने चालू आहेत.

### योगींना मोदी व्हायचे आहे

उत्तर प्रदेशात पुढील निवडणुका २०२७ मध्ये होणार आहेत. तोवर आदित्यनाथांच्या आशीर्वादाने या भानगडी उत्तरोत्तर वाढत जातील असे दिसते. आदित्यनाथांना भाजपमध्ये स्वतःचा गट मजबूत करायचा आहे. नरेंद्र मोदींना २०२९ मध्ये निवडणूक लढवणे सोपे नसेल. त्यांचाच ७५ वर्षानंतर निवृत्तीचा निर्णय त्यांना दाखवला जाईल. त्यामुळे त्यांची जागा घेण्यासाठी आतापासूनची ही मोर्चेबांधणी आहे. मधल्या काळात दिल्लीतील मिडियाने आदित्यनाथ यांना मोदींइतकीच प्रसिध्दी देऊन त्यांना राष्ट्रीय नेते बनवले. मोदींइतकीच त्यांचीही क्रेझ असल्याचे वातावरण निर्माण करण्यात आले. मात्र २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला उत्तर प्रदेशात दणका बसल्याने योगींचे नावही एकदम मागे फेकले गेले. आता त्यांनी चर्चेत येण्यासाठी हा मंदिर वही बनायेंगेचा फॉर्म्युला निवडला आहे. गंमत अशी आहे की, याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विरोध आहे. अयोध्येत राममंदिर हा हिंदूंच्या अस्मितेचा विषय होता. पण म्हणून आता प्रत्येक मशिदीखाली शिवलिंग शोधण्याचा उपद्व्याप करू नका असे सरसंघचालक मोहन भागवत काही दिवसांपूर्वी म्हणाले होते. त्यानंतर डिसेंबरात पुण्यात संजीवन व्याख्यानमालेत भारत- विश्वगुरु या विषयावरच्या बोलताना त्यांनी पुन्हा तसेच मत मांडले. पण आदित्यनाथ आणि त्यांच्या पाठीशी असलेले उत्तरेतले संतमहंत यांनी त्यांना थेट आव्हान दिले आहे. अखिल भारतीय संत समितीचे स्वामी जितेंद्रानंद सरस्वती यांनी पहिली तोफ डागली. संघ ही सांस्कृतिक संघटना आहे, तिने धार्मिक बाबतीत बोलू नये असे म्हणून त्यांनी संघाचे दात त्याच्याच घशात घातले. मंदिर वगैरेसारखे मुद्दे हे श्रध्देचा व धर्माचा विषय आहेत. त्याबाबत आमच्यासारखे धार्मिक गुरु जो निर्णय घेतील तो संघाने आणि विश्व हिंदू परिषदेने मान्य केला पाहिजे असेही त्यांनी बजावले. ज्योतिर्मठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनीही भागवतांवर हल्ला केला. संघाच्या शंभर वर्षांच्या इतिहासात सरसंघचालकांना असे आव्हान कोणीही दिले नसेल. हिंदी सिनेमातले सिक्वेल किंवा भाग दोन अनेकदा अपयशी झाल्याचे दाखले आहेत. मंदिर वही बनायेंगेचा हा दुसरा भाग मात्र सहजासहजी नामोहरम होणार नाही. देशाच्या आणि भाजपच्याही राजकारणात तो विध्वंस घडवून आणू शकतो.

## विचार

# 'पत्रकारिता काल आणि आज!'






भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेने भारताला लोकशाही राज्यव्यवस्था दिली. लोकमताचा आदर करणाऱ्या निवडणुका हा लोकशाहीचा कणा आहे असं म्हटलं जातं. लोकशाही विधीपालिका, कार्यपालिका, न्यायपालिका या तीन आधारस्तंभाबरोबरच पत्रकारिता हा चौथा आधारस्तंभ मानला जातो. हा एकप्रकारे पत्रकारितेचा गौरव आहे असं म्हटलं तर ते वावगं ठरू नये. वर्तमानपत्रांच्या माध्यमातून अन्यायाविरूद्ध लढा देणे, याचबरोबर सर्वसामान्य जनतेसाठी जिव्हाळ्याने, प्रबोधनाला लेखन करणे, सामाजिक समता, बंधूता व एकता व राष्ट्रीयता राखण्यासाठी मार्गदर्शनपर लेख लिहिणे हे कौशल्य पत्रकारितेच्या माध्यमातून करता येते. याच मौलिक विचारांतून बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले.

स्वातंत्र्यपूर्व काळात हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून लोकमान्य टिळकांनी 'केसरी' वर्तमानपत्र सुरू केले. त्यावेळी वर्तमानपत्र सुरू करताना संपादकांना प्रकाशकांना आणि लेखकांना त्यागाची भूमिका घेऊनच या चौथ्या स्तंभाचा सन्मान राखण्याची हृढ भावना हृदयी बाळगावी लागे. निस्सीम ध्येय, त्याग विचारांची दिशा व परखडपणा हे गुण ज्यांच्या अंगी असतील त्यांनीच पत्रकारितेत पाऊल टाकावे यामुळेच लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची बूज राखली जाईल. हा विश्वास तत्कालिन पत्रकारांमध्ये होता आणि म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी एका कवितेत लिहिले आहे, 'कि घेतले व्रत हे आम्ही अंधतेने

**लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग माने ।**
**हे दिव्य दाहक म्हणूनी असावयाचे ।**
**वाण धरिले करी हे सतीचे ।।'**

व्रतसाधना ही पत्रकारितेची मुल्य दिशा होती. व्यवसायापेक्षा जनजागरण, स्वातंत्र्याची मशाल पेटविण्याचे अग्रलेख व सामाजिक अन्यायाविरूद्ध बंडखोरी संपादकांच्या लेखणीतून अंगार बनून शब्दबद्ध होत असे. वास्तवाचे सुरेख दर्शन हा पत्रकारितेचा ध्यास होता. राष्ट्रभक्तीची जोपासना हे ब्रीद होते. याचा अर्थ असा नाही की आपल्या घरात तुळशीपत्र ठेवून या क्षेत्रात यश मिळवावे. आजकाल वर्तमानपत्र चालविणे हे धाडसाचे पाऊल आहे हे विसरता येत नाही. पत्रकारांना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. एजंट सांभाळणे, पार्सल बांधणे या नित्याचाच अवघड गोष्टी असतात. वर्तमानपत्र कोणत्याही समुहाचे असो. भांडवलदारांचे स्तोम माजलेले असो. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न लोकांपुढे आणणे ही अपेक्षा समाजमनाची असते. त्यासाठी अभ्यासूवृत्ती अंगी जोपासणे हे पत्रकारांचे आद्य कर्तव्य आहे. जनतेच्या शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या उपेक्षित समाजाच्या बेकारीने गांजलेल्या युवकांच्या तक्रारी शासन दरबारी पोहचविणे हे काम वर्तमानपत्राच्या माध्यमातून पत्रकारांना जबाबदारी करावी लागते.

एक काळ असा होता. पत्रकारांची संपादकीय विचारांची भीती समाजामध्ये, धनदांडग्यांमध्ये राजकीय नेत्यांमध्ये होती. केसरीमध्ये परखडपणे लिहून 'या सरकारचे डोके फिरले आहे काय?' असे प्रश्न समाजापुढे लो. टिळकांनी निर्भिडपणे ठेवले. समाजसुधारक आगरकर, म. गांधी, म. ज्योतिबा फुले या लेखणीतील ज्वलंतपणा लोकांना भावत असे. वर्तमानपत्र हा जनमनाचा आरसा आहे. प्रसिद्धीच्या वेगवेगळ्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकार करीत असतात. घेतला वसा टाकणार नाही. ही भावना आज फारच थोड्या पत्रकारांमध्ये दिसून येते. अन्यथा पत्रकारितेचा अभ्यास नसणाऱ्या, मात्र समाजात खोटी प्रशंसा मिरविणाऱ्या पत्रकारांचा आज सुळसुळाट झालेला आहे. त्यातही शहरी पत्रकारिता व ग्रामीण पत्रकारिता हा भेदाभेद दिसून येतोच. केवळ वर्तमानपत्राची ओळख खिशात ठेवून दुकानदारी करायची व प्रतिष्ठितपणाचा आव आणून एखाद्या राजकीय नेत्यासमवेत फिरायचे ही आजकाल फॅशन झालेली आहे.

**बाळ सिंगासने**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत दैनिक मराठाचे संपादक आचार्य अत्रे, प्रजामित्रचे संपादक एस.एम. जोशी, मुंबई सकाळचे ना.थि. परूळेकर, दै. नवाकाळचे निळुभाऊ खाडीलकर, दै. कृषीवलचे मान्यवर प्रभाकर पाटील, केशवराव धोंडगे, कॉ. डांगे इत्यादी पत्रकारांनी महाराष्ट्रात स्वतंत्र महाराष्ट्र चळवळीसाठी रान माजविले. विचारांची धगधगती मशाल पेटविली. यानंतरही लोकसत्तेचे संपादक ह.रा. महाजनी, नवशक्तीचे प्रबोधनकार ठाकरे, पु.रा. बेहरे, विद्याधर गोखले यांच्या लेखणीच्या सामर्थ्याने समाज प्रबोधनाचे कार्य केलेले आहे.

आज मात्र खेदाने म्हणावेसे वाटते, हीच पत्रकारिता केवळ धंद्यासाठी भांडवलदारांची बटीक झालेली आहे. अमेरिकेतील एक उदाहरण प्रसिद्ध आहे. तेथील सामान्य पत्रकाराने 'वॉटरगेट' प्रकरण उघडकीस आणले. यामुळे तेथील तत्कालिन अध्यक्षांना बुश यांना सत्तेचा त्याग करावा लागला. महाराष्ट्रात पत्रकारांच्या जागृत भावनेने सन १९६० मध्ये महाराष्ट्र स्वतंत्र झाला. पत्रकारांच्या लेखणीची ताकद अनमोल आहे. याचा जणू विसरच पडला आहे असे जाणवते. याचे कारण पण गंमतीदार आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात आज आपआपल्या प्रभागात राजकीय नेते स्वतःचे संस्थान म्हणून वावरत आहेत. आपल्या कार्यक्षेत्रात दहशतवादी दबाव निर्माण करून सत्तापिपासू लोकनेते चैनीत हिंडत आहेत. एखादा पत्रकार मासा गळात अडकवून त्याद्वारे प्रसिद्धी व प्रतिष्ठा मिळवत आहे. पत्रकारांवर दबावतंत्राचा वापर करायचा आणि त्यांना पाकिट बंद भेटी देऊन खुश करायचे हे चित्र आज लपून राहिलेले नाही. पूर्वी राजदरबारी राजाचे स्तुतीपाठक असत. आज हेच काम काही पत्रकार करीत असल्याने समाजातील वास्तवता अथवा एखाद्या घटनेतील सत्य प्रकर्षाने पुढे येत नाही. ही पत्रकारितेच्या क्षेत्रातील वेदना, विवेचन आहे यामुळे वाचक संभ्रमात पडतात. खरे काय? खोटे का? स्पष्टपणे जाणवत नाही. कधीकधी तर अशाही घटना आज दिसतात की एखाद्या पत्रकाराने स्पष्टपणे वास्तव समाजापुढे मांडले तर त्याला या राजकीय नेते अथवा घटना संबंधित धटिंगण, गुंड लोकांकडून मारहाण होते. प्रसंगी पत्रकाराचा बळीही घेतला जात आहे. समाजातील हे दारूण चित्र लोक पाहतात परंतु मांजराच्या गळ्यात घंटा बांधायची कुणी? हा प्रश्न पडतोच की!

जेव्हा समाज जागृत होतो तेव्हा सत्ताधारी राजालाही स्वतःची खुर्ची सांभाळणे कठीण जाते. हे वास्तव कुणीही नाकारू शकत नाही. आजही असे काही पत्रकार आहेत की ते जीवावर उदार होऊन पत्रकारिता करतात, जे सत्य ते समाजासमोर आणतात. मात्र भांडवलशाही पत्रकारितेत असे स्वतंत्रबाण्याने लिहिणारे फार थोडे लोक आहेत. काहींना तर यामुळे नोकरीवर तुळशीपत्र ठेवावे लागते ही शोकांतिका आहे. असं नाही म्हटलं तर ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. शासकीय दलाल झालेल्या पत्रकारांकडून सत्य कसे उलगडणार?

आजच्या पत्रकारितेत पत्रकार समूहामध्ये स्पर्धा सुरू झालेली आहे. माझेच वर्तमानपत्र श्रेष्ठ अशी चढाओढ दिसून येते. त्यामुळे नवे प्रयोग म्हणून रंगीत पानांच्या आवृत्त्या प्रसिद्ध होऊ लागल्या. एखादं लहान मुल आकर्षित दिसावं म्हणून त्याला नवीन रंगीत, चमकारे झबले-टोपले घातले जातात. त्याप्रमाणेच वर्तमानपत्राचे पहिले पूर्ण पान रंगीत, दिमाखदारपणे छापले जाते. त्यात पुढाऱ्यांच्या वाढदिवसाचे चित्रण ही फॅशनच झालेली आहे. पहिल्या कव्हर पेजवर मोठ्या कंपन्यांच्या जाहिराती लक्ष वेधून घेतात हे खरे. परंतु इथेच वर्तमानपत्राचा आत्मा मलिन झाल्याचे कुणाही सुबुद्ध वाचकाला कळले हे नाकारता येईल काय? शिवाय डिजीटल तंत्रज्ञान हे वर्तमान क्षेत्रातील अडथळे आहेत असं आम्हाला वाटलं. मोबाईलवरील युट्यूब, फेसबुक इत्यादी चॅनल, टी.व्ही. चॅनलवरील स्पर्धात्मक भाष्य याचे कुरण वाटत चालले आहे. आज पत्रकारितेच्या नावाखाली काही पत्रकारांची भामटेगिरी सुद्धा प्रभावितपणे झालेली आहे. पण याकडे लक्ष कोण देणार?

नाटक-सिनेमाच्या प्रदर्शनात सेन्सॉर बोर्डचा धाक असतो. पत्र काही चॅनलच्या बोगस, अंदाजे बातम्यावर सेन्सार आहे का हा प्रश्न राहून राहून आमच्या मनाला भिडतो. सर्वांनाच दोषी ठरवता येणार नाही परंतु काही पत्रकारितेची दिशा विंचवासारखी विष पेरणारी डंख मारणारी दिसून येते. राजकीय पुढाऱ्यांच्या बातम्यांना अधिक महत्व दिले जाते. समाजात अन्य कितीतरी चांगल्या गोष्टी घडतात परंतु या बातम्या कुठेतरी छोट्या मथळ्याखाली छापल्या जातात. अनेक सत्य घटनांची उपेक्षाच होते. जाहिराती छापणे हा वर्तमानपत्राचा आत्मा आहे, श्वास आहे. त्याशिवाय वर्तमानपत्रे जगूच शकणार नाही. शेवटी पत्रकारांनाही पोट असते. संसार असतात. मात्र स्वाभिमान भांडवलदारांच्या पेढीवर गहाण ठेवून राजसत्तेच्या दबावाखाली जी पत्रकारिता चालते ती लोकशाहीचा गळा घोटणारी आहे हे विसरून चालणार नाही.

## चर्चा आजची

# निसर्गाची संपन्नता अर्थकारणाचे द्योतक

अलिबाग शहराची ओळखही भात आणि मासेमारीसाठी अधिक लोकाभिमुख आहे. निसर्गाने अलिबागला वरदहस्त संपन्नतेचे दान दिले आहे. मात्र, त्याचा फारसा उपयोग आजही होताना दिसत नाही. याला सरकारी धोरण, लोकप्रतिनिधींची कमकुवत दूरदृष्टी, प्रशासनाची उदासीनता आणि स्थानिकांचे अज्ञान कारणीभूत आहे. यातून लवकरच मार्ग काढला नाही, तर बाहेरुन येणारे आपल्या निसर्ग संपन्नतेवर मेहनत करुन गडगंज होतील, तेव्हा मात्र स्थानिकांच्या मुळावर घाव घातला, अशी ओरड करुन काहीच अर्थ राहणार नाही.

अलिबाग शहर हे पूर्वी समुद्राचाच भाग होते. आगरी, कोळी समाजासह अन्य समाजाने घाम गाळून आपल्या अपार मेहनतीने समुद्राल मागे सारले. या ठिकाणी सुरुवातीला भात, नारळ, सुपारी अशीच पीके घेतली जात होती. तसेच समुद्र, खाडी, नद्या जवळ असल्याने मासेमारी करणे येथील स्थानिकांचा व्यवसाय होता. भात आणि मासा निसर्गाने दिलेला असल्याने येथील नागरिक खऱ्या अर्थाने सधन होते. पुढे औद्योगिकरणाच्या रेट्यामध्ये शेती नष्ट होऊन तेथे विविध कंपन्या उभ्या राहिल्या आहेत.

उद्योगांचा विकास झाला पाहिजे, मात्र तो निसर्गाला धक्का लावून विकास होणार असेल, तर त्याला वेळीच रोखणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. उद्योग उभारताना ते पर्यावरणपुरक तसेच निसर्गाशी सुसंगत असले पाहीजेत. आता सुसंगत म्हणजे काय असा प्रश्न तुम्हाल पडला असेल (म्हणूनच मी सुरुवातील स्थानिकांचे अज्ञान असा उल्लेख केला) सहाजिकच हा प्रश्न सर्वांनाच पडला नसेल काही विद्वानांना याची निश्चित माहिती असणार आहे. सुसंगत विकास या मुळ मद्द्यावर मी येतो. निसर्गाने आपल्याला समुद्र दिलेला आहे. त्याच समुद्रात विविध प्रकारचे स्वादीष्ठ मासेदेखील दिले आहेत. सध्या मासेमारीच्या



**आविष्कार देसाई**

व्यवसायाला म्हणावा तसा वाव असल्याचे दिसत नाही. आजही आपल्याकडील मासे हे स्थानिक पातळीवरच विकले जातात. त्यामुळे मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्यांना म्हणावा तसा आर्थिक लाभ होताना दिसत नाही. आज शेतीचे क्षेत्र नष्ट होत असताना अशा शेतांमध्ये शेततळी उभारुन तेथे माशांची पैदास केली पाहिजे. तेच मासे मोठ्या-मोठ्या टँकमध्ये भरायचे आणि गावोगावी जाऊन विकायचे. म्हणजे विकत घेणाऱ्याला ताजे मासे मिळतील. तसेच विक्री करणाऱ्याच्या नफ्यामध्ये नक्कीच वाढ होईल. असा प्रयोग सातारा जिल्ह्यात रायगडचे अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी केला होता. त्यावेळी ते त्या ठिकाणी तहसिलदार म्हणून कार्यरत होते. त्यांनी लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षामध्ये रुपांतर झाले आहे. याला तब्बस २५ वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. मात्र तेथे आर्थिक सधनता आणण्यात त्यांना यश आले हे विसरता येणार नाही. आपल्याकडेही असा प्रयोग केला तो नक्कीत यशस्वी होईल. कारण आपल्याला निसर्गाने भरभरुन दिले आहे आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये आपल्यासारखी परिस्थिती नाही. हे लक्षात घेतले पाहिजे.

आपल्याकडे शीतगृहांची कमतरता आहे. ती भरुन काढण्यासाठी प्रत्येक छोट्या-मोठ्या बंदरावर तशी सोय असणे गरजेचे आहे. तसे झाल्यास येथील मासेमारी करणारा हा माशांची साठवणूक करु शकतो. त्याच्या मालाला चांगला दर येईल. तेव्हा तो व्यापाऱ्याला विकू शकेल. याप्रसंगी व्यापारी मालाचा दर पाडू शकण्याची हिम्मत करु शकणार नाहीत.

पर्यटनवाढीसाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी आपल्याकडे आहेत. मात्र त्याचा आपण अजून पुरेपूर वापर करत नाही. गोवा, केरळ राज्यांनी पर्यटनाच्या माध्यमातून जगाच्या आर्थिक क्षितीजावर आपले नाव कोरले आहे. परदेशातील पर्यटनस्थळांच्या तोडीस तोड आपल्याकडील पर्यटन हे खरोखरच बहारदार आहे. या ठिकाणी रस्ते, पाणी, वाहतूक अशी पायाभूत सुविधा उभारल्यास पर्यटनवाढीला चालना मिळू शकेल. त्यामुळे वाढत्या बेरोजगारीला सहज लगाम घालता येईल. यासाठी सर्वांनी मिळून शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## लोकसंसद

### कांदळवनाला वाचवणे गरजेचे

अलीकडेच 'भारतीय वन सर्वेक्षण अहवाल २०२३' प्रकाशित करण्यात आला. या अहवालानुसार ठाणे जिल्हा, मुंबई शहर आणि उपनगरातील कांदळवने मोठ्या प्रमाणात नष्ट झाल्याचे समोर आले आहे. २०२१ ते २०२३ या दोन वर्षांमध्ये ठाणे जिल्ह्यातील एकूण ९३ हेक्टर कांदळवन क्षेत्र नष्ट झाले आहे. तर मुंबई उपनगरांतील १८ हेक्टर आणि मुंबई शहरातील ३ हेक्टर कांदळवन क्षेत्र नष्ट झाल्याचे अहवालात स्पष्ट झाले आहे. एकीकडे पायाभूत विकासकामांच्या नावाखाली ठाणे जिल्ह्याच्या किनारपट्टीवरील कांदळवनावर कुऱ्हाड चालवली जात आहे. तर दुसरीकडे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे समुद्राच्या भरती-ओहोटीच्या पाणथळ जमिनीवर भराव टाकून अवैधरित्या झोपड्या उभारल्या जात आहेत. अशा परिस्थितीत खारफुटीचे जंगल वेगाने नष्ट होत आहे. वास्तविक पाणथळ क्षेत्रातील खारफुटीची कत्तल करण्यावर व कांदळवनापासून ५० मीटरपर्यंत माती भराव किंवा बांधकाम करण्यास उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. असे असतानाही अशा प्रकारच्या खारफुटीच्या कत्तलीच्या अनेक घटना सातत्याने घडत आहेत. समुद्र काठावरची तिवरांची झाडे, खारफुटी आणि कांदळवन हे एक नैसर्गिक संरक्षण असून समुद्रीय जीवसृष्टीच्या संरक्षण व संवर्धनासाठी व एकूणच पर्यावरणाच्या संरक्षणासाठी ते वाचवणे गरजेचे आहे.

**-प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

### वेतन खाती राष्ट्रीयीकृत बँकेतच

शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी तसेच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीसाठी मुंबै जिल्हा मध्यवर्ती बँकेत खाते उघडण्यास महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आल्याचे कळते. भाजप आमदार प्रवीण दरेकर अध्यक्ष असलेल्या मुंबै बँकेला महायुती सरकारने झुकते माप दिले आहे. काही वर्षांपूर्वी पोलिस विभागातील बहुतांश वेतन खाती 'स्टेट बँक ऑफ इंडिया'कडून अॅक्सिस बँकेत हस्तांतरित करण्यात आली होती. खरं तर महामंडळे, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडील निधी राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतवण्यासंदर्भात वेळोवेळी 'कॅग'ने (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक) शिफारशी केलेल्या आहेत. त्यानुसार वेतन खातीही राष्ट्रीयीकृत बँकेत असायला हवी. पण तसे होताना दिसत नाही. सरकार बदलल्यानंतर वेतन खात्याच्या बँकाही बदलल्या जातात हे दिसून आले आहे आणि या बदलांमागे राजकीय हितसंबंध असल्याचे आरोपही नंतर होताना दिसतात. त्यामुळे अशी वेतन खाती वारंवार न बदलता राष्ट्रीयीकृत बँकेतच कायमस्वरुपी असावीत.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

## दिनविशेष

# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

समाजाचे प्रबोधन व्हावे या उद्देशाने बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी वार शुक्रवार इ.स. १८३२ रोजी दर्पण नावाचे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. त्या दिवसाची आठवण म्हणून ६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. ब्रिटिश राज्यकर्त्यांना कळावे म्हणून त्याकाळी दर्पणचा एक स्तंभ मराठीत व एक स्तंभ इंग्रजीत असे.

मुंबईतल्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये असताना व समाजात वावरताना बाळशास्त्रींना अनेक समस्या अस्वस्थ करीत. पारतंत्र्याने ग्रासलेला देश, याबरोबरच समाजातील अनेक रूढी, चालीरीती, अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुती यामुळे एतद्देशीय समाज कसा व्याधिग्रस्त झाला आहे, या विचाराने ते चिंता करीत. केवळ महाविद्यालयात शिकवून उपयोग नाही, तर संपूर्ण समाजालाच धडे दिले पाहिजेत. ते करायचे असेल तर समाजाचेच प्रबोधन करावे लागेल, असे त्यांच्या लक्षात आले. त्यासाठी वृत्तपत्र काढावे, असे त्यांना वाटू लागले. या जाणिवेतून आपले सहयोगी गोविंद विठ्ठल कुंटे उर्फ भाऊ महाजनांच्या मदतीने त्यांनी दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र काढले.



६ जानेवारी १८३२ रोजी दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला. या वृत्तपत्राची किंमत १ रुपया होती. इंग्रजी आणि मराठी अशा जोड भाषांत प्रकाशित होणाऱ्या या वृत्तपत्राच्या अंकात दोन स्तंभ असत. मराठी मजकूर अर्थातच सर्वसामान्य जनतेसाठी होता आणि इंग्रजी मजकूर वृत्तपत्रात काय लिहिले आहे, हे राज्यकर्त्यांनाही कळावे यासाठी होता. वृत्तपत्राची संकल्पना त्या काळी लोकांना नवीन होती. त्यामुळे दर्पणचे वर्गणीदार सुरुवातीच्या काळात खूप कमी होते. पण हळूहळू लोकांमध्ये ही संकल्पना जशी रुजली, तसे त्यातील विचारही रुजले आणि प्रतिसाद वाढत गेला. दर्पणवर प्रथमपासूनच बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा ठसा होता. दर्पण अशा रीतीने साडे आठ वर्षे चालले आणि जुलै १८४० मध्ये त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. मराठी पत्रकारितेची महान परंपरा बाळशास्त्री जांभेकर, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, खाडिलकर, महाजनी, पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव, आचार्य अत्रे यांच्यापासून सुरू झालेली आहे. त्या काळातली छपाईची अपुरी साधने, त्या काळातल्या वृत्तपत्रांच्या संकल्पना, छपाईच्या क्षेत्रात आज जी उत्तुंग झेप घेतली गेली आहे, तशी कोणतीही व्यवस्था नसताना आणि दोन पैसे फायदा मिळवून या व्यवसायाचा धंदा न करता केलेली पत्रकारिता हे मराठी पत्रकारितेचे खरे कूळ आहे.

आज मराठी पत्रकारिता नव्या दिशेने जात आहे. अनेक नवे प्रवाह यामध्ये सामील झाले आहेत. त्याचबरोबर बदलत्या काळात काही आव्हानेही उभी राहिली आहेत. त्यांचा सामना येणाऱ्या काळात करावा लागणार आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ जानेवारी

१) श्री. जयराम अंबाजी थळे
अलिबाग, ६-१-१९४०
२) श्रीम. सुरेखा सुरेश कुलकर्णी
अलिबाग, ६-१-१९४९
३) श्री. अनंत नथुराम पडते
नवगाव, ६-१-१९३५
४) श्री. मदनलाल बनवारीलाल कुमावत
अलिबाग, ६-१-१९६३

# वाचनामुळे संस्कृती उंचावते

## प्राचार्य दिगंबर टेकळे यांचे प्रतिपादन



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

आजचा विध्यार्थी हा पुस्तक वाचनात कमी आणि मोबाईल वापरताना जास्त दिसतो.वाचनापासुन दुर आणि मोबाईलचा वापर जास्त होत असल्याने आपला भविष्य हाताने वाया घालवत आहोत. आपला हेतु किंवा उद्दीष्ट साध्य करायचा असेल तर आधी पाया मजबुत करावा लागेल त्यासाठी वाचनाची जोड गरजेची आहे. जिवनात जिवंत राहायचं असेल, वाचायच असेल तर आधी वाचल पाहिजे. खास करुन विद्यार्थि वर्गाने पुढील भविष्य उज्वल करण्यासाठी वाचनावर भर दिला पाहिजे, अशी अपेक्षा प्रा. दिगंबर टेकळे यांनी व्यक्त केली.

म्हसळा वसंतराव नाईक कला, वाणिज्य व बॅ.ए.आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य शासनाच्या उच्च शिक्षिण विभाग मागील काही वर्षांपासून मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करीत असताना नव्याने राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या संकल्पनेने विविध कार्यक्रमाच्या आयोजनातून वाचन संस्कृती जोपासण्यासाठी महाराष्ट्रात १ जानेवारी ते १५ जानेवारीपर्यंत वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा कार्यक्रम होणार आहे.

मोबाईल वर वाचता येते पण पुस्तक वाचनात आणि मोबाईलमधील वाचनात फार तफावत आहे. मोबाईल आपली मेमरी ताब्यात घेऊन त्याचे अनेक दुष्परिणाम भोगावे लागतात. याचे उदाहरण देवुन स्पष्ट केले. ग्रंथ दिंडीचे आयोजन करून कॉलेज आणि वाचनालय एकत्र आल्याने चांगले वाटल्याचे प्रा.टेकले यांनी सांगीतले. विचारांची देवाण घेवाण झाली आणि संवाद साधताना फायदा होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयाचे संयुक्त विद्यमाने वाचन अभिमान अंतर्गत ग्रंथदिंडी काढण्यात आली. या वेळी कार्यक्रमाला वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, उपाध्यक्षा अपर्णा ओक, सचिव अशोक काते, प्राचार्य दिगंबर टेकळे, ग्रंथपाल प्रा. रायप्पा माशाल, प्रा.भोसले, प्रा.शिरीष समेल, प्रा.सिद्धीकी, प्रा.दुंडे,संचालक मंडळाचे सदस्य दिलीप करंबे, ग्रंथपाल उदय करडे, वैभव कळस, सायली चोगले, प्राची मेंदाडकर आदी मान्यवर कॉलेज विध्यार्थी विद्यार्थिनींनी दिंडीत सहभागी झाले होते. प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि आभार ग्रंथपाल प्रा. रायप्पा माशाल यांनी केले.

# रेझिंग डे निमित्त सायबर क्राईमबाबत जनजागृती

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

४ जानेवारी रोजी पहल नर्चरिंग लाईव्स कौशल्य प्रशिक्षण केंद्र खालापूर व स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल गोरठण बुद्रुक याठिकाणी खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस उपनिरीक्षक अलोक खिसमतराव, पोलीस हवालदार सतीश जगधने, महिला पोलीस हवालदार कीर्ती कांबळे, गोपनीय विभागाचे दिनेश भोईर, समीर पवार, पोलीस स्टाफ गणेश चौधरी व रुपाली शिंदे आदीनी रेझिंग डे निमित्त महिला बाल सुरक्षा वाहतूक नियमन, सायबर क्राईम जनजागृती करीत विद्यार्थ्यांशी व शिक्षकांशी संवाद साधला.

यावेळी महिला व बालक सुरक्षा, वाहतुक नियमन, सायबर क्राईम गुन्हे व ते घडु नयेत याबाबत घ्यावयाची दक्षता याबाबत माहिती दिली. तसेच उपस्थित विदयार्थी व शिक्षकांना डायल ११२, पोलीस काका, पोलीस दिदी यांचे संपर्क क्रमांक देण्यात आले असुन सायबर क्राईम हेल्पलाईन नंबर, वेबसाईट बाबत माहिती देण्यात आली. व त्यांना येणाऱ्या तक्रारी, समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. पोलीसांकडे असलेल्या शस्त्रांची ओळख करून देण्यात आली.

२ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पोलीस स्थापना दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्या निमित्ताने खालापूर पोलीस हद्दीतील अनेक शाळा, कॉलेजांमध्ये पोलीस दलातर्फे रेझिंग डे सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. पोलीस रेझिंग डे दिनानिमित्त विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबण्यात येत आहेत.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


# विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल कंपनीमार्फत परिसरात वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये बेलोशी येथील को.ए.सो.लोकनेते ॲड. दत्ता पाटील हायस्कूलमधील शाळकरी मुलींसाठी मोफत स्वसंरक्षणाचे धडे देण्याचा उपक्रम सुरु केला. स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिरातून मुलींना कराटे प्रशिक्षण देण्यात आले. आंतरराष्ट्रीय खेळाडू तपस्वी गोंधळी यांच्यामार्फत पाच दिवस धडे दिले जाणार आहेत.

गेल कंपनीतील मुख्य महाप्रबंधक अनुप गुप्ता, महाप्रबंधक जितीन सक्सेना व शितल लाकरा यांच्या मार्गदर्शनातून या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक संतोष बोंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी, सहाय्यक शिक्षक रवींद्र शिंदे, मुकेश कोळी, सचिन कांबळे, काशिनाथ मुंबईकर, श्रीनिवास साळसकर, नितीन गावित, सहाय्यक शिक्षिका कल्पना कोळी, दिपाली शेळके, नीता म्हात्रे, कनिष्ठ लेखनिक श्रेया चेरकर प्रशिक्षिका प्रणाली तळेगावकर, मनीषा माने, दिव्या शिंदे, निकी बेंडे व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

अल्पवयीन मुलीवर अत्याचाराच्या घटना वाढू लागल्या आहेत. संकटकाळी स्वतःचे रक्षण करण्याचे बळ मुलींना मिळाले पाहिजे. हा उद्देश समोर ठेवून उसर येथील गेल कंपनीमार्फत बेलोशी येथील हायस्कूलमधील विद्यार्थीनींसाठी पाच दिवस स्वसंरक्षणाचे धडे देण्याचे शिबीर सुरु केले आहे. या कालावधीत मुलींना कराटेचे धडे देऊन त्यांना सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या शिबीराला विद्यार्थीनींकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सर्व मुलींनी हिरहीरीने सहभाग घेऊन कराटेचे धडे घेण्याचा प्रयत्न केला. शिबिराच्या उदघाटनप्रसंगी संतोष बोंद्रे यांनी शिबिरात सहभागी झालेल्या मुलींना शुभेच्छा देत स्वसंरक्षणाचे महत्त्व सांगितले.

## शुभम नलावडे सीए परिक्षा उत्तीर्ण

**माणगाव :** निजामपूर विभागातील सणसवाडी सारख्या ग्रामीण भागात राहुन कठिण परिस्थितीवर मात करुन कुमार शुभम नलावडे हा वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी चार्टर्ड अकाऊंटट (सीए) झाला. त्याच्या या यशाबद्दल निजामपूर विभागातुन अभिनंदनाचा वर्षाव होत असुन परिसरातील नागरिकांनी शुभम याला भेटून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



शुभमचा प्रवास सोपा नव्हता. आई-वडील शेतकरी असुन सर्वसामान्य परिस्थितीतुन त्याचं शिक्षण पुर्ण झालं. स्वतःच्या मेहनतीवर, धैर्यावर आणि स्वतःवर असलेल्या विश्वासामुळे आज हे यश तो मिळवु शकला.



# पथनाट्य स्पर्धेत धाटाव केंद्र शाळा प्रथम

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

रोहा तालुकास्तरीय व्यक्तिमत्व स्पर्धा नुकत्याच पार पडल्या मोठ्या गटामध्ये केंद्रीय शाळा धाटावने प्रथम क्रमांक पटकावून त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली तसेच लहान गटात समूहगीत स्पर्धेत या शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या घवघवीत यशामुळे त्यांचे शिक्षकांकडून त्याचप्रमाणे पालक वर्गाकडून विशेष अभिनंदन होत आहे.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी केंद्रप्रमुख गायकर, वनिता पवार, मानसी थळे, निकिता धुपकर प्रांजली जंगम मोहिनी पाटील त्याचप्रमाणे विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले धाटाव केंद्र शाळेने आजपर्यंत विविध स्पर्धेत सहभागी होऊन अनेक बक्षीस पटकावली आहेत. ही शाळा सातत्याने रोहा तालुक्याचे नाव लौकिक करत आहे.

शिक्षकांची अपार मेहनत आणि विद्यार्थ्यांची चिकाटी यामुळे ही शाळा नावारूपाला आलेली आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशामुळे शिक्षक, विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात येते आहे, तसेच कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## महिलेची केली मोफत प्रसुती

**पनवेल :** यशोदा हॉस्पिटलमध्ये एका सोसायटीच्या सुरक्षारक्षकाच्या बायकोला प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले होते. परिवाराची परिस्थिती बेताची असल्याने दिशा व्यासपीठाकडून या महिलेची नाव नोंदणी यशोदा हॉस्पिटलमध्ये करण्यात आली.

डॉ. स्नेहलता खडबडे व डॉ. बाळासाहेब खडबडे डॉक्टरांनी ज्या प्रकारे व्यासपीठाला ग्वाही दिली होती त्यानुसार या महिलेची प्रसूती मोफत करून पुन्हा आदर्श निर्माण केला.

# अधिकाऱ्यांनी घेतली स्मार्ट कामांची माहिती



**। हमरापूर । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडून पेण तालुक्यातील वाशी स्मार्ट ग्राम योजनेच्या कामांची माहिती घेण्यात आली. लोकसहभागातून उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा विकास करून पर्यावरणाचा समतोल राखणे त्यातून समृद्ध ग्राम निर्माण करणे, ही संकल्पना प्रभावी पद्धतीने राबविण्यासाठी स्मार्ट ग्राम योजना शासनातर्फे राबविण्यात आली आहे. या योजनेंतर्गत उद्दिष्टे पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना निधीच्या स्वरूपात पुरस्कार दिला जातो.

पेण तालुक्यातील वाशी ग्रामपंचायत स्मार्ट ग्राम योजनेत सहभागी झाली असल्यामुळे परीक्षण करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांनी वाशी ग्रामपंचायत भेट देऊन कामाची माहिती घेतली. वाशी ग्रामपंचायतीच्यावतीने राबविण्यात आलेला घनकचरा व्यवस्थापन व विलगीकरण प्रकल्प, १३ एकर परिसर व्यापलेला वाशी अमृत सरोवर जलसाठा, पाणीटंचाई उपाययोजना, शाळा, अंगणवाडी जगदंबा मंदिर परिसर यांची उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांनी पाहाणी केली. यावेळी सरपंच संदेश ठाकूर, ग्रामसेवक राजेंद्र गुडदे, उपसरपंच कोमल म्हात्रे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

## भरधाव ट्रकची कारला धडक; चालकाचा मृत्यू

**पनवेल :** सायन-पनवेल महामार्गावर खारघरजवळ पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास बेलापूरकडे जाणाऱ्या कारचा अपघात झाला. यात चालकाचा जागीच मृत्यू झाला. भरधाव ट्रकने धडक दिल्याने हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे. गोविंद कन्हैयालाल शर्मा (वय ४०) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस तपास करत आहेत.

# ओएसिसच्या कलाकारांची पथनाट्यातून जनजागृती



**। रेवदंडा । वार्ताहर ।**

नेहरू युवा केंद्र रायगड अलिबाग आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था रेवदंडा अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने नववर्षाच्या पूर्वसंध्येला अलिबाग मुरुड तालुक्यातील गावांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसंदर्भात जनजागृती करण्यात आली.

जिल्हा युवा समन्वयक निशांत रौतेला यांच्या मार्गदर्शनांतर्गत तसेच संस्थापक अध्यक्ष प्रतिक कोळी यांच्या नेतृत्वाखाली जुनं ते सोनं या शीर्षकाखाली पथनाट्य सादर करून, त्याद्वारे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, त्यावरील पर्यायी उपाय, घरातील व समाजातील ज्येष्ठ नागरिकांची जागा आणि महत्व, शासनाकडून योजना रूपाने मिळणारी मदत याबाबत सांगोपांग प्रबोधन करण्यात आले. हा प्रबोधन उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिक कोळी, दर्श नागोटकर, मल्लिनाथ जमादार, सार्थक गायकवाड, सिद्धांत ठाकूर, वेदांती पाटील, प्रगती कासार, प्रतिक पाटील यांनी यशस्वी सहभाग नोंदवला.

काळानुसार प्रगती साधत असताना एकत्र कुटुंब पद्धती, आजीबाईचा बटवा, आजोबांच्या किस्येकहाण्या, संस्कार, नितीमूल्ये यांचा दिवसागणिक लोप होत आहे. घरातील ज्येष्ठ अडगळ ठरत आहेत. शिवाय ज्या वृद्धांसाठी शासन योजनांच्या माध्यमातून मदत करू इच्छिते ते ज्येष्ठ अज्ञानामुळे या मदतीपासून वंचित राहत आहेत. आणि याकरिताच नेहरू युवा केंद्र आणि ओएसिस च्या माध्यमातून स्थानिक पातळीवर जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून हा उपक्रम राबविण्यात आला.

# पद्मदुर्गावर शिवशाही पद्मदुर्ग जागर उत्साहात साजरा



**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड येथील पदमदुर्ग जागर संवर्धन समिती व कोकण कडा मित्र मंडळ महाड आयोजित पद्मदुर्ग जागर छत्रपती शिवरायांच्या पद्मदुर्ग किल्ल्यावर मोठ्या उत्साहात साजरा झाला. किल्ला स्वच्छ राहावा व पडझड होऊ नये. याकरिता मुरुड पद्मदुर्ग जागर संवर्धन समिती व कोकण कडा मित्रमंडळ यांनी १५ वर्षांपूर्वी जागर कार्यक्रम सुरु केला होता.

आज पद्मदुर्ग किल्लावर सकाळी शिवप्रेमी शेखरमामा फरमान यांच्या हस्ते गड पूजन करण्यात आले. शिवप्रतिमेचे विधिवत राजपुरोहित प्रकाश स्वामी जंगम यांच्या मंत्रउच्चारात केले गेले. शिव आरती करण्यात आली. सोबतच तेथे कोटेश्वरी देवीचे मूळ स्थान असून पूजन करण्यात आले.

शिवरायानी जंजिरा किल्ल्यावर करडी नजर ठेवण्यासाठी खोल अरबी समुद्रात ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ला बांधला होता. या किल्लावर पावसाळ्यानंतर मोठ्या प्रमाणावर गवत वाढले होते. याप्रसंगी अध्यक्ष सुरेश पवार, ठाकूर, संकेत वडके, रोहित पवार जयश्री राऊळ (बंदर निरीक्षक) यांच्यासह आदी शिवप्रेमी उपस्थित होते.

# विज्ञान प्रदर्शनात नांदगाव विद्यालयाची बक्षीसाची कमाई



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

शिक्षण विभाग पंचायत समिती सुधागड व श्री राज एज्युकेशन सेंटर घोटावडे यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ वे सुधागड तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन श्री राज एज्युकेशन सेंटर इंग्रजी माध्यम घोटावडे परळी येथे २ आणि ३ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते.

तालुका विज्ञान प्रदर्शनानिमित्त विज्ञान प्रतिकृती परीक्षण, निबंध, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा स्पर्धाचे आयोजन केले होते. या विज्ञान प्रदर्शनात नांदगाव विद्यालयातील ९ ते १२ वी या गटातील विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रतिकृतीमध्ये तृतीय क्रमांक, निबंध स्पर्धा द्वितीय आणि तृतीय क्रमांक, वक्तृत्व स्पर्धा तृतीय क्रमांक, प्रश्नमंजुषा द्वितीय क्रमांकाची कमाई केली. विद्यार्थी, शिक्षक अशोक शिंदे, स्वाती शिंदे, विद्या भिसे यांचे संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांनी अभिनंदन केले.

## महिलांच्या पंखाला मिळतेय रोजगाराचे बळ | बाजारात आरोग्यदायी पदार्थांना मागणी वाढली

# चविष्ट लाडूंनी गृहउद्योगाला अर्थ चालना

**। पाली । प्रतिनिधी ।**

संक्रांत आणि थंडीच्या हंगामात लोक तिळगुळासोबत विविध प्रकारच्या पौष्टिक लाडूंचा आस्वाद घेत आहेत. यामध्ये नाचणी लाडू, खजूर-शेंगदाणा लाडू, बेसन लाडू, डिंक लाडू, मेथी लाडू व मखाना लाडू यांना विशेष मागणी आहे. हे लाडू केवळ चविष्टच नाहीत, तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहेत. शिवाय गृहउद्योगाला व महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली



आहे. हिवाळ्यात शरीराला पोषण देणारे हे लाडू घरगुती पदार्थ म्हणून तयार होतात. ज्यामुळे लोक त्याला अधिक प्राधान्य देतात. संक्रांतीच्या सणानिमित्त बाजारात या लाडूंची विक्री झपाट्याने वाढली आहे. थंडीच्या दिवसात तिळगुळासोबत या लाडूंनी आरोग्यदायी गोडवा निर्माण करण्याचा आनंद सुद्धा लोक घेत आहेत.

> **हे लाडू पौष्टिक व चविष्ट देखील आहेत. थंडी व संक्रांतमुळे सध्या मागणी वाढली आहे. ऑनलाईन ऑर्डर देखील मिळत आहेत. रायगड जिल्ह्यासह, ठाणे, मुंबई, नवी मुंबई आदी ठिकाणी योग्य पॅकिंग करून सर्व परवानग्या घेऊन पुरवठा केला जात आहे. गृहउद्योग व महिला बचत गट यांना या माध्यमातून रोजगाराची चांगली संधी उपलब्ध झाली आहे.**
> **- रेश्मा अजय दुधाणे, संचालक श्री अवनी एंटरप्राइजेस**

### संक्रांत, थंडीमध्ये पारंपरिक व पौष्टिक लाडूंचा आस्वाद

संक्रांत हा फक्त तिळगुळाच्या गोडव्याचा सण नसून, सणासुदीला आरोग्यसंपन्न राहण्यासाठी विविध पौष्टिक लाडूंची लोकप्रियता झपाट्याने वाढत आहे. यामध्ये नाचणी, खजूर-शेंगदाणा, बेसन, दिंड, मेथी आणि मखाना लाडू यांचा विशेष समावेश आहे.

### लाडूंचे आरोग्यविषयक फायदे

नाचणी लाडू- भरपूर कॅल्शियम मुळे हाडे बळकट होतात. थंडीत उष्णता निर्माण करण्यासाठी उपयुक्त.
खजूर-शेंगदाणा लाडू-साखरेला नैसर्गिक आणि आरोग्यदायी पर्याय, उर्जादायक आणि पचनासाठी लाभदायक आहे.

# मोटार सायकलस्वाराला मारहाण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मोटार सायकलला धडक दिल्याने झालेल्या बाचाबाचीदरम्यान कारमधील तीन अनोळखी इसमांनी २७ वर्षीय तरुणाला शिवीगाळ आणि दमदाटी करून मारहाण केली. या वेळी झालेल्या झटापटीत या तरुणाची दोन तोळ्याची सोन्याची चेन गहाळ झाली. या प्रकरणी मारहाण करणाऱ्या कारमधील तीन अज्ञातांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाताणपाडा येथील तुषार मुकादम हा अजिवली येथून घरी जाण्यापूर्वी त्याच्या दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी पेट्रोल पंपावर गेला होता. या वेळी येथे आलेली एक कार मागे घेत असताना कारचा मागचा भाग तुषार याच्या दुचाकीला धडकल्याने तो खाली पडला. या वेळी तुषार याने तुम्हाला मागे पुढे बघून कार मागे घेता येत नाही का? असे बोलला असता कारमधील तीन इसमांनी माफी मागण्याऐवजी खाली उतरून तुषार याला शिवीगाळ करून मारहाण केली. तुषार त्यांना प्रतिकार करत असताना त्यांच्यातील एकाने मागून येऊन डोक्यावर टणक वस्तूने फटका मारला. तो खाली कोसळून बेशुद्ध पडला. मारहाण करणारे तेथून निघून गेले. तुषारच्या मित्रांनी घटनास्थळी धाव घेत त्याला दवाखान्यात नेले. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# निवडक



## पर्यटकांनी गजबजले चवदार तळे

**महाड :** शहरातील ऐतिहासिक चवदार तळ्यावर शालेय सहली व हजारो पर्यटकांची गर्दी होऊ लागल्याने परिसर व उद्यान गजबजले आहे. सध्या थंडीचा कडाका वाढला असून पर्यटनाचा मोसमही बहरला आहे. फेब्रुवारीपर्यंत थंडीचा हंगाम असल्याने रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक येत आहेत. चवदार तळे तसेच परिसरात सकाळच्या वेळी धुके पसरत असल्याने वातावरण आल्हाददायक झाले आहे. याचाच फायदा घेत चवदार तळे येथे दररोज हजारो पर्यटक, भीमसैनिक व विद्यार्थी भेट देत आहेत. ऐतिहासिक व सामाजिक संघर्षाचे ठिकाण असल्याने चवदार तळे परिसरात दरवर्षी पर्यटक गर्दी करतात; परंतु या वर्षी त्यांची संख्या वाढलेली दिसते. तळ्यासमोर असलेले उद्यान दिवसभर गजबजलेले दिसते. सायंकाळी तळ्याभोवती नगरपालिकेने लावलेली विद्युत रोषणाई तसेच विजेच्या दिव्यांमुळे चवदार तळे झगमगले आहे. विद्यार्थ्यांना चवदार तळ्याचे महत्त्व कळावे, यासाठी शालेय सहली मोठ्या प्रमाणात येत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, तसेच ज्या ठिकाणी बाबासाहेबांनी चवदार तळ्यातील पाणी प्राशन केले त्या ठिकाणाला विद्यार्थी आवर्जून भेट देतात. याशिवाय रायगड किल्ला, प्रतापगड, श्रीवर्धन व हरिहरेश्वर आदी ठिकाणी शालेय सहलींचे आयोजन करण्यात येत आहे. राज्यातील छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, परभणी, बीड, पाथर्डी अशा दूरच्या ठिकाणाहून आतापर्यंत शालेय सहली दाखल झाल्या आहेत.

## संक्रांतीसाठी काळ्या वस्त्रांना मागणी

**अलिबाग :** इंग्रजी नववर्षाच्या सुरुवातीलाच येणारा पहिला सण म्हणजे मकर संक्रांत. येत्या मंगळवारी, १४ जानेवारीला मकर संक्रांत आहे. तीळगूळ घ्या, गोड गोड बोला असं म्हणत हा दिवस सगळा राग, रुसवा विसरून साजरा केला जातो. या सणाचे वेगळेपण म्हणजे एरवी अशुभ मानला जाणारा काळा रंग या दिवशी आवर्जून वापरला जातो. त्यानिमित्त बाजारात काळ्या रंगाचे विविध पोषाख विक्रीसाठी दाखल झाले आहेत. नववधू किंवा घरातील लहान मुलांची पहिली संक्रांत ही आनंदाने आणि उत्साहाने साजरी केली जाते. या दिवशी लहान मुलांना काळ्या रंगाचे कपडे घातले जातात. या दिवशी स्त्रिया आवर्जून काळ्या रंगाच्या साड्या परिधान करतात. इरकल, चंद्रकला, खडीची साडी, काठापदराच्या साड्या किंवा सिल्कच्या काळ्या रंगाच्या साड्यांना मोठी पसंती असते. मकर संक्रांत हा सण घरगुती न राहता आता तो कार्पोरेट सेक्टरमध्येदेखील उत्साहाने साजरा केला जातो. स्त्रियाच नव्हे, तर आता मुलीदेखील काळ्या रंगाच्या साड्या या दिवशी नेसतात. फक्त प्लेन, साध्या काळ्या साड्या नेसण्याबरोबरच थोड्या हटके लूकच्या साड्या नेसण्याकडे स्त्रियांचा कल असतो. या साड्यांना अपेक्षेपेक्षा जास्त पसंती मिळत आहे. मकर संक्रांतीचे औचित्य साधून काळ्या रंगात वेगवेगळे बदल करून हटके लूक दिलेल्या साड्या बाजारात आल्या आहेत.

## चौलमधील हिंगुलजा देवीची यात्रा १३ जानेवारीला

**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील चौल गावाला निसर्गाचे वरदान लाभले असून वावे रस्त्यावरील गायचोळे भागात टेकडीवर हिंगुलजा देवीचे मंदिर आहे. सिंधु संस्कृतीचे श्रद्धास्थान असलेल्या या पर्यटनस्थळाला सध्या भाविक मोठ्या संख्येने भेट देत आहेत. या वर्षी १३ जानेवारीला मंदिर परिसरात यात्रा भरणार आहे.हिंदू संस्कृती दक्षिणेकडे विस्तारित झाल्यावर या देवतेची त्या त्या भागात मंदिरे उभारल्याचे दिसून येत आहे. त्यापैकी चौलचे एक हिंगुलजा मातेचे मंदिर. सुमारे दोनशे पायऱ्या चढून गेल्यावर मंदिराची भव्यता लक्षात येते.भन्साळी समाज दहाव्या शतकात चौलच्या बंदरात व्यवसायानिमित्त आले व त्यांनी हिंगुलजा देवीला आपली कुलदेवता मानली. या समाजाची अनेक कुटुंबे जरी मुंबईत राहत असली तरी पौष पौर्णिमेला न चुकता दर्शनासाठी येतात. देवीबद्दल अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. अगदी परशुरामापासून ते श्रीरामापर्यंत अनेकांशी या कथा निगडित आहेत. रावणवधानंतर श्रीराम, सीता, लक्ष्मण आणि हनुमान यांच्यासमवेत देवीचे दर्शन घेतल्याची आख्यायिका आहे. गुजरात व राजस्थान राज्यात हिंगुलजा मातेची मंदिरे असून शक्तिपीठ असलेली ही देवी अनेक नावांनी ओळखली जाते.




## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **जमिनीची खरेदी व विक्री** अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८८०३
- **अलिबाग येथे कंस्ट्रक्शन** कंपनी साठी पिकअप वर ड्रायव्हर पाहिजे ८८०६७५९०९०, ९६२३६८७१५७
- **वरसोली रायगड आदर्श नगर येथे** NA ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेंट- ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड समुद्रकिनाऱ्यापासून** ३५० मीटर अंतरावर ३६० मीटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत. १.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्यासाठी योग्य- ९८२२२५७९२९
- Resort + Bunglow. Available fully developed Resort +Bunglow Plot Area 15.1 R Land (with exclusix Access 3.0R) on chondhi kihim Road, just 500 meters from beach, Rate Rs. 30 Lac Per Guntha. Total Lumsum price Rs 4.5 crore. All cheque payment 9822257929.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# डेब्रिज टाकणारी १५० वाहने जप्त

## • सिडकोची वर्षभरात दमदार कारवाई; १६५ जणांना करण्यात आली अटक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

सिडकोच्या जागेवर मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रिज टाकणाऱ्या तसेच मातीचे उत्खनन करून त्याची चोरी करणाऱ्यांविरोधात सिडकोने गत वर्षभरात कारवाई करून ५६ गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये १६५ आरोपींना अटक करून १५० ट्रक, डम्पर व तीन जेसीबी आणि पोकलेन जप्त केले आहे.

मुंबईसह आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. या कामाच्या ठिकाणावरून निघणारे मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रिज काही व्यक्तींकडून सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जागेमध्ये तसेच त्याच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये अनधिकृतपणे टाकण्यात येत आहे. काही व्यक्तींकडून मातीचे उत्खनन करून त्याचीदेखील चोरी करण्यात येते. या प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली अनधिकृत बांधकाम विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार सिडकोच्या अभियांत्रिकी विभागाचे अभियंते, अनधिकृत बांधकाम विभागाचे मुख्य नियंत्रक, अधिकारी व अभियंते, सुरक्षा अधिकारी व सुरक्षारक्षकांच्या पथकाने गत वर्षभरामध्ये मोहीम राबवून संपादित केलेल्या जागेवर डेब्रिज टाकणाऱ्यांविरोधात धडक कारवाई केली.

### ५६ गुन्हे दाखल

**विशेष मोहिमेदरम्यान सिडकोच्या जागेवर अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्यांविरोधात विविध पोलिस ठाण्यांत ५६ गुन्हे दाखल करून १६५ आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. या कारवायांमध्ये १५० ट्रक-डम्पर, तीन जेसीबी, पोकलेन आदी वाहनेदेखील जप्त करण्यात आली आहेत.**



> **“सिडकोच्या परिक्षेत्रात विकासकामे प्रगतिपथावर असून, सिडको परिसरात मानवी आरोग्यास हानिकारक अशा प्रकारचा कचरा, बांधकामाचा राडारोडा, उत्खननातील दगडमाती टाकण्यास सक्त मनाई आहे. असे करताना कोणी आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याबद्दल www.cidco. maharashrta.gov.in या वेबसाईटवर तसेच संबंधित पोलिस ठाण्यास माहिती द्यावी.”**
> **- सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको.**

## वीर भाई कोतवाल पुण्यतिथी साजरी

**| माणगाव | वार्ताहर |**


माणगाव शहर संघटना यांच्या वतीने हुतात्मा वीर भाई कोतवाल पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. संदीप शिंदे व चंद्रकांत यादव यांनी वीर भाई कोतवालांच्या फोटोला पुष्पहार अर्पण केला, तर दीप प्रज्वलन सिताराम भोसले, किरण जाधव, सचिन जाधव, अखिल चव्हाण, अनंत हुजरे यांनी केले. या वेळी वीर भाई कोतवाल शहर सलून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष जयंत शिंदे, अखिल चव्हाण, उपाध्यक्ष कृष्णा साळुंखे, कार्याध्यक्ष शहानु शहा आदी उपस्थित होते. संघटनेचे माजी अध्यक्ष राहुल कडव यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. संदीप शिंदे यांनी वीर भाई कोतवाल यांच्या संदर्भात मनोगत व्यक्त केले. आलेल्या उपस्थितांनी देखील वीर भाई कोतवाल यांची महती सांगणारे अनेक दाखले आपल्या भाषणातून सादर केले.

# वायर तुटल्याने कोकण रेल्वे विस्कळीत

## चार तास कोंडी; प्रवाशांचे झाले हाल

**| रायगड | प्रतिनिधी |**

कोकण रेल्वे मार्गावरील आडवली ते विलवडे या स्थानकादरम्यान दुपारी साडेबारा वाजता ओव्हरहेड वायर तुटली. दुपारी दोन वाजता तुटलेली वायर जोडणीचे काम पूर्ण करण्यात आले. या दरम्यान रत्नागिरी ते वैभववाडी स्थानकात सर्व गाड्या थांबवून ठेवण्यात आल्या. दुपारी दोननंतर वाहतूक सुरू झाली, मात्र सर्वच गाड्या चार ते साडेचार तास विलंबाने धावत असल्याने प्रवाशांचे हाल झाले.



दरम्यान, सिंधुदुर्गात येणारी मांडवी एक्स्प्रेस, दिवा-सावंतवाडी, मंगला एक्स्प्रेस या गाड्या रात्री आठनंतर कणकवली व इतर स्थानकांत दाखल होणार असल्याने प्रवाशांना आपले गाव गाठण्यासाठी खासगी वाहनांचा आधार आणि अधिक खर्चाचा भुर्दंड सहन करावा लागला. रेल्वे मार्गावरील आडवली (ता. लांजा) या स्थानकादरम्यान ओव्हरहेड वायर दुपारी साडेबाराच्या सुमारास तुटली. त्यानंतर कोकण रेल्वे प्रशासनाने तातडीने कामगार आणि यंत्रणा आणून वायर दुरुस्तीचे काम सुरू केले. यात मुंबई-मडगाव मांडवी एक्स्प्रेस संगमेश्वर येथे, मडगाव-मुंबई मांडवी एक्स्प्रेस, मुंबई-मडगाव तेजस एक्स्प्रेस रत्नागिरी तर जनशताब्दी आडवली येथे थांबवली.

# ज्ञानकरी जाहले वारकरी...



## पीएनपी महाविद्यालय परिसरात फडकली ग्रंथपताका

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालय आणि भाषा विभागांतर्फे ग्रंथदिंडीचे आयोजन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले होते.

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत ग्रंथोत्सव आणि ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रंथदिंडीचे पूजन आणि उद्घाटन अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे संचालक प्रा. विक्रांत वार्डे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. रवींद्र पाटील, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. कांचन मात्रे, कार्यालयीन सल्लागार गीते सर, कला व मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील, संस्थेचे जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी पालखीतील सरस्वती व ग्रंथपूजा करून केली. यानंतर ग्रंथ सेवेच्या पालखीची पताका किशोर साळे यांनी खांद्यावर घेऊन यानंतर सर्व मान्यवर आणि विद्यार्थी यांच्या साहित पालखी गोकुळेश्वर मंदिर ते संपूर्ण संकुलामध्ये फिरवण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी रिंगण सादर केले. महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे यांनी ग्रंथदिंडीच्या आयोजनाविषयी भूमिका स्पष्ट करून पालखीचे यशस्वीपणे आयोजन केल्याबद्दल ग्रंथालय विभागाचे विशेष कौतुक केले. सदर पालखी आयोजन वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातर्फे करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. रसिका म्हात्रे, प्रा.पूजा म्हात्रे, प्रा. केतकी पाटील, प्रा. सुजित पाटील, प्रा. दिनेश पाटील, प्रा. मिलिंद घाडगे, प्रा तेजेश म्हात्रे, प्रा. गणेश पाटील, प्रा. प्रदीप गावंड, प्रा. वृषाली घरत, प्रा. योगिता पाटील, प्रा. रूपाली पाटील, प्रा. कैलाससिंह राजपूत, प्रा. हितेश पाटील या सर्वांनी मेहनत घेतली. ग्रंथ दिंडीचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी उपस्थितांचे कौतुक केले.

# जेएनपीएचा कृषी प्रक्रिया प्रकल्प लवकरच

**| उरण | वार्ताहर |**

जेएनपीएने कृषी माल प्रक्रिया आणि साठवण सुविधा विकसित करण्यासाठी मेसर्स ट्रायडेंट ॲग्रोकॉम एक्सपोर्टस प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स मॅन इन्फ्राकॉन्स्ट्रक्शन लिमिटेड (कंसोर्टियम) यांना अधिकृत पत्र दिले आहे. हा प्रकल्प बंदर संकुलातील २७ एकर जमिनीवर उभारला जाणार असून, या प्रकल्पाचे मूल्य अंदाजे २८४ कोटी रुपये आहे.

कृषी माल प्रक्रिला आणि साठवण प्रकल्प भारतातील कृषी लॉजिस्टिक क्षमता वाढवेल व देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कृषी व्यापाराच्या वाढीला आधार देणारा ठरेल. नवीन वर्षात प्रगती आणि विकासाला गती देण्यावर तसेच प्रमुख प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी वेगवान काम सुनिश्चित करण्यावर लक्ष असल्याचे जेएनपीए प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी सांगितले. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर दरवर्षी सुमारे १.२ दशलक्ष टन माल हाताळण्याची अपेक्षा असून, कृषी मालासाठी प्रक्रिया, साठवण आणि वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून देशाच्या कृषी व्यापारात लक्षणीय योगदान मिळणे अपेक्षित असल्याचे वाघ यांनी सांगितले.

जेएनपीएने पुरवलेली ही भारतातील अशा प्रकारची पहिलीच सुविधा आहे. अन्न सुरक्षा आणि व्यापार नियमांचे पालन सुनिश्चित करण्याच्या वचनबद्धतेवर भर देत प्रक्रिया, वर्गीकरण, पॅकिंग आणि प्रयोगशाळा सुविधांसह सर्वसमावेशक सेवा प्रदान करण्यासाठी या सुविधेची रचना करण्यात आली आहे.

केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या इतर राज्यांच्या कृषी उत्पादनांच्यादेखील गरजा या प्रकल्पातून पूर्ण केल्या जाणार आहेत. या प्रकल्पाला १६ जुलै २०२४ला केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्याकडून मंजुरी मिळाली आहे.

## फर्जंद अल्ली रोगे यांचे निधन

**रोहा :** रोह्याचे माजी उपनगराध्यक्ष तथा रोहा खालचा मोहल्ला मुस्लिम समाज माजी अध्यक्ष फर्जंद अल्ली रोगे यांचे राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्ष होते. त्यांनी सलग १५ वर्ष समाज अध्यक्ष व विविध पदावर उल्लेखनीय कामगिरी केली. अल्ली भाई रोगे यांच्या निधनाने मुस्लिम समाजात पोकळी निर्माण झाली आहे. शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता त्यांच्या निवासस्थानावरून त्यांची अंत्ययात्रा निघाली. अंत्ययात्रेत हिंदू-मुस्लिम बांधव सामील झाले होते.

# कडधान्यवर्गीय पिकांकडे शेतकऱ्यांचा ओढा

**| रायगड | प्रतिनिधी |**

खरीप हंगामात जिल्ह्यात भात हे महत्त्वाचे पीक असून, शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे. रब्बी हंगामात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कडवा वाल, चवळी आणि हरभरा या कडधान्यवर्गीय पिकांची लागवड केली असून, सद्य:स्थितीत हरभऱ्याच्या पिकानेदेखील जोम धरला आहे.

खरीप हंगामात भातपीक घेतल्यानंतर शेतकरी प्रामुख्याने वाल, हरभरा, भाजीपाला ही पिके घेतात. पाण्याची सोय नसलेल्या ठिकाणी जमिनीच्या ओलितावर ही पिके घेण्यात येत असल्याने खूप मेहनत व खर्च न करता उत्पन्न मिळणारी ही पिके आहेत. द्विदलवर्गीय कडधान्य पिके घेतल्यामुळे हवेतील नत्र जमिनीत स्थिरीकरण होऊन पुढील पिकाला त्याचा फायदा होतो व रब्बी हंगामातील पीक उत्पादन वाढून हवेतील नत्र पुढील पिकाला मिळते. कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी संशोधन केंद्र रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विभागाचे अधिकारी शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर जाऊन लागवड करण्यात आलेल्या हरभरा पिकाविषयी सातत्याने मार्गदर्शन करीत आहेत.

# महाडमधील गटसाधन समूह केंद्राची दुरवस्था

**| महाड | वार्ताहर |**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत महाड पंचायत समितीच्या आवारात बांधण्यात आलेल्या गटसाधन समूह केंद्राची इमारत धोकादायक झाली आहे. इमारतीच्या दरवाजे, खिडक्या तसेच भिंतींनाही तडे गेले आहेत. स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या ठिकाणी काम करणे कर्मचाऱ्यांसाठी जोखमीचे झाले आहे.

नव्याने बांधण्यात येणारी इमारत दुमजली असावी, अशी पालक व शिक्षणप्रेमींची मागणी आहे. ग्रामीण भागातील कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये, तसेच शैक्षणिक सुविधा प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात याकरिता सर्व शिक्षा अभियान सुरू करण्यात आले होते.

अभियानातून गाव-वाडीवर नवीन शाळा इमारतीदेखील बांधण्यात आल्या. त्याचप्रमाणे तालुकास्तरावरदेखील सर्व शिक्षण अभियानांतर्गत विविध कामकाज सांभाळण्यासाठी तसेच विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी गटसाधन समूह केंद्राची निर्मिती करण्यात आली. त्यानुसार प्रत्येक तालुक्यांमध्ये पंचायत समिती येथे गट साधन समूह केंद्रे बांधण्यात आली. महाडमध्ये पंचायत समितीच्या आवारात २००६ मध्ये गट साधन समूह केंद्र बांधण्यात आले. तत्कालीन खासदार मनोहर जोशी यांच्या हस्ते आमदार माणिक जगताप व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत या समूह केंद्राचे उद्घाटन करण्यात आले होते

इमारतीत बांधकामाला १९ वर्षे पूर्ण झाले असून देखभाल-दुरुस्तीअभावी ती धोकादायक झाली आहे. इमारतीला गळती लागली म्हणून त्याच्यावर पत्राशेड टाकण्यात आले आहे; परंतु पावसाळ्यामध्ये इमारतीला मोठ्या प्रमाणात ओलावा येतो, त्यामुळे येथे काम करणे कर्मचाऱ्यांकरिता धोकादायक झाले आहे. २०२१ला आलेल्या महापुरातही इमारत पाण्याखाली गेल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. इमारतीच्या दरवाजे, खिडक्यांची मोडतोड झाली असून भिंतींना तडे गेले आहेत. स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली आहे.सर्व शिक्षा अभियानांतर्गत काम करणारे विषयतज्ज्ञ व अन्य शैक्षणिक काम करणारे कर्मचारी यांचा गट साधन समूह केंद्राच्या इमारतीत नेहमीच वावर असतो, तसेच सर्व शिक्षा अभियानांतर्गत विविध उपक्रमही राबवले जातात. शालेय पुस्तके, गणवेश तसेच इतर शैक्षणिक सामग्रीदेखील या ठिकाणी उतरवली जाते.

### वावेमधील रायगड रॉयल रायडर्स ग्रुपचा उपक्रम | गावागावात जनजागृती करण्याचा निर्धार

# दुचाकी रॅलीतून पर्यावरण संरक्षणाचा संदेश

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

वाढत्या प्रदुषणामुळे आरोग्य धोक्यात येण्याची भिती निर्माण झाली आहे. अलिबाग तालुक्यातील वावे येथील रायगड रॉयल रायडर्स ग्रुपने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पुढाकार घेत दुचाकी रॅलीतून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्याचे काम केले आहे. अलिबाग तालुक्यातील वावे ते लोणावळ्यापर्यंत रॅली काढून झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश गावागावात पोहचविण्याचा प्रयत्न केला.



वावे येथील रायगड रॉयल रायडर्स ग्रुप गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत आहे. २५ वर्षापासून ५० वर्षापर्यंतची मंडळी या ग्रुपमध्ये कार्यरत आहेत. आपला नोकरी व्यवसाय सांभाळत हा ग्रुप वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवून जनतेमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न करीत आली आहे. दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी दुचाकीवर जाऊन तेथील नागरिकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याबरोबरच शिक्षणाचे महत्व तसेच मुलगी शिकली प्रगती झाली, पाणी वाचवा हा संदेश पोहचवण्याचा प्रयत्न करीत आले आहेत. यावर्षी देखील ग्रामीण भागातील वावे येथील रायगड रॉयल रायडर्स ग्रुपने बांधिलकी जपत वावे ते लोणावळा पवना लेक राईडपर्यंत दुचाकीवर प्रवास केला. हेल्मेट घालून त्यांनी हा प्रवास केला असताना ताम्हिणी घाटात होत असलेले अपघात रोखण्यासाठी दुचाकीवर प्रवास करताना हेल्मेट वापरा हा संदेश पोहचविण्याचे काम केले. तसेच सिमेंटच्या जंगलात वावरत असताना पर्यावरणाचा समतोल बिघडू लागला आहे. झाडांची बेसुमार कत्तल केली जात आहे. त्यामुळे या ग्रुपने पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी झाडे लावा झाडे जगवा हा संदेश पोहचविण्याचा प्रयत्न या रॅलीतून केला. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

> **“ग्रामीण भागातील आम्ही मंडळी गेल्या अनेक वर्षापासून दुचाकी रॅली काढत आहोत. ही रॅली काढण्याचा उद्देश म्हणजे समाजात अंधश्रध्दा निर्मूलन, शिक्षण, व इतर उपक्रमांबाबत जनजागृती करून नागरिकांना जागरूक करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. आमच्या प्रयत्नांना निश्चित यश येईल याची आम्हाला खात्री आहे.”**
> **- गितेश पाटील, रायगड रॉयल रायडर्स**

# अनधिकृत दुकान गाळ्यांचे बांधकाम सुरूच

## नेरळ विकास प्राधिकरणाची केवळ बघ्याची भूमिका?

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**नेरळ विकास संकुल प्राधिकरण हद्दीतील ममदापूर ग्रामपंचायतमध्ये नियोजित मुख्य रस्त्यात अनधिकृत दुकान गाळ्यांचे बांधकाम सुरू आहे. त्याबाबत तक्रार केल्यानंतर नेरळ विकास प्राधिकरणाच्या पत्रांना केराची टोपली दाखवीत येत आहे. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकाचे अनधिकृत काम जोरात करीत आहे आणि त्यामुळे नेरळ विकास संकुल प्राधिकरणाचा अशा अनधिकृत बांधकाम यांना पाठिंबा आहे काय? अशी चर्चा सुरु आहे.**




नेरळ ममदापूर येथील सुकून रेसिडेन्सी या प्रोजेक्ट चे मे.रिफा स्ट्रक्चरल सोल्युशन तर्फे डायरेक्टर अतिउल्ला खान यांच्या माध्यमातून नेरळ ममदापूर मुख्य रस्त्यात अनधिकृत बांधकाम केला जात आहे. नेरळ प्राधिकरण मधील कोणत्याही ग्रामपंचायतीमधील बांधकाम यांना परवानगी प्राधिकरण देत असते. मात्र, अतिउल्ला खान यांच्यापर्यंत आतापर्यंत कोणत्याही प्रकारची परवानगी घेतली नाही. ममदापूर गावातील नेरळ ममदापूर मुख्य रस्त्यात सध्या अनधिकृत दुकान गाळ्यांचे बांधकाम केले जात आहे. मुख्य रस्ता आणि तक्रारदार राहील शेख यांच्या जागेच्या काही भागात अतिक्रमण केले आहे. त्यासंबंधी राहील शेख यांनी तक्रार केली असता सदर व्यावसायिकास नेरळ विकास प्राधिकरण यांच्याकडून नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, सदर नोटीसला नेरळ विकास संकुल प्राधिकरणकडून केराची टोपली दाखवत आहे. त्यामुळे सध्या त्या ठिकाणचे बांधकाम जोरात सुरु आहे.

नेरळ विकास प्राधिकरणाचे तांत्रिक अधिकारी उपअभियंता निलेश खिल्लारे यांच्याकडे केली आहे. तक्रार दाखल केल्यानंतर नेरळ विकास प्राधिकरणचे तांत्रिक अधिकारी यांनी केवळ कागदोपत्री पाहून घेतली आहेत. मात्र, प्राधिकरण हद्दीतील रस्त्याच्या जागेत अनधिकृत बांधकाम हटवण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली नाही. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार ते वारंवार पाठपुरावा करीत असूनदेखील अधिकाऱ्यांची उदासीनता दिसून येत आहे. ते सदर अनधिकृत बांधकामास पाठीशी घालत आहेत. अनधिकृत बांधकाम केव्हा पाडले जाईल? ते नक्की पाडणार आहात की नाही? अधिकाऱ्यांना कारवाईस करण्यासाठी एवढा वेळ का लागतो? असे अनेक प्रश्न तक्रारदार यांनी उपस्थित केले आहेत.

> **आम्हाला बांधकाम परवानगी किंवा भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठी सर्व कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. त्यावेळी सर्व अधिकृत असूनदेखील छोट्या-छोट्या गोष्टींसाठी अधिकाऱ्यांच्या दालनात पायपीट करावी लागते. मात्र, सदर व्यावसायिकाने रस्त्यात व माझ्या जागेत अतिक्रमण करूनदेखील आमच्या वारंवार मागणी नंतरसुद्धा त्यावर कारवाई केली जात नाही यावरून अधिकारी यांची मानसिकता दिसून येत आहे.**
> **- राहील शेख, तक्रारदार**

# महिला बालसुरक्षा, सायबर क्राईम जनजागृती

## • रेझिंग डेनिमित्त विद्यार्थ्यांशी संवाद • खालापूर पोलिसांचा स्तुत्य उपक्रम

**। वावोशी । वार्ताहर ।**




खालापूरपोलीसठाण्याच्यावतीने रेझिंग डेनिमित्त महिला आणि बाल सुरक्षा, वाहतूक नियमन आणि सायबर क्राईम जनजागृती अभियान राबवण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये सुरक्षा आणि सायबर गुन्हे टाळण्यासाठी जागरूकता निर्माण करणे हा होता. पहल नर्चरिंग लाईव्स कौशल्य प्रशिक्षण केंद्र, खालापूर आणि विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल, गोरठण बुद्रुक येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या नेतृत्वाखालील टीमने विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधला.

या कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक अलोक खिसमतराव, पोह. जगधने, पोह. दिनेश भोईर, मपोह. कांबळे, पोशि. पवार, मपोशि. शिंदे आणि पोशि. गणेश चौधरी यांनी सहभाग घेतला होता. त्यांनी महिला व बालक सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन आणि सायबर गुन्ह्यांबाबत घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच डायल ११२ : हा क्रमांक आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांशी संपर्क साधण्यासाठी केला जातो, पोलीस काका/पोलीस दीदी संपर्क विद्यार्थ्यांना त्वरित मदत मिळवून देण्यासाठी स्थानिक पोलिसांचे संपर्क क्रमांक दिले गेले. सायबर क्राईम हेल्पलाईन: सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक व अधिकृत वेबसाइटची माहिती, शस्त्रांची ओळख: विद्यार्थ्यांना पोलिसांकडे असलेल्या शस्त्रांची माहिती देण्यात आली, ज्यामुळे त्यांच्यात पोलिसांविषयी विश्वास निर्माण झाला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आणि तक्रारी पोलीस अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. यावर अधिकाऱ्यांनी तात्काळ उपाययोजना सुचवून त्यांना योग्य सल्ला दिला. हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडत खालापूर पोलीस विभागाकडून समाजात सुरक्षिततेचा संदेश रुजवण्याचा चांगला प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.




# कौशल्य रोजगाराच्या लाभार्थींना मुदतवाढ द्या

## अरविंद गायकर यांची मागणी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

राज्याचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तरुण-तरुणींना कौशल्य रोजगार उद्योजकता अंतर्गत शासकीय कार्यालयात रोजगार उपलब्ध करुन दिला होता. आता त्यांचा कार्यकाळ संपत येत असल्याने त्यांना मुदतवाढ द्यावी, अशी मागणी मुरुड शेगवाड्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी रोजगार हमी फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. याची प्रत मुरूडचे नायब तहसीलदार राजेश्री साळवी यांना देण्यात आली आहे.

यावेळी ॲड. मृणाल खोत, शैलेश वारेकर, माजी सभापती आशिका ठाकूर, लाभार्थी आश्विन मंगेश विरुकुड, लाभार्थी अर्णा अमित पाटील, लाभार्थी अर्चना सूरज म्हात्रे आदींसह अन्य लाभार्थी उपस्थित होते.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत तालुक्यातील ४१ तरुण-तरुणी ऑनलाईन फार्म भरून शासकीय कार्यालयात सहा महिन्यांकरिता रूजू झाले होते. आता या तरुणांचा कार्यकाल संपत असल्याने पुन्हा बेकारी उद्‌भवू नये त्याकरिता पदवीधर असणाऱ्या लाभार्थींचा कामाचा कार्यकाळ वाढवावा, अशी मागणी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे करण्यात आली आहे. या निवेदनाची एक प्रत महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे, खा. सुनील तटकरे, जिल्हाधिकारी, मुरुड तहसीलदार व मुरुड जंजिरा नगरपरिषद यांना देण्यात आली आहे.

# आबांची शिकवण हीच यशाची गुरुकिल्ली




## पी.पी. खारपाटील यांचे प्रतिपादन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

स्वर्गीय आबांचे आदर्श विचार, शिकवण हीच आमच्या यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष पी.पी. खारपाटील यांनी केले. पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार (दि. ३) रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मान्यवरांचे स्वागत स्वागताध्यक्ष राजेंद्र खारपाटील, समीर खारपाटील, वर्षा खारपाटील, सुनिता खारपाटील अर्चना ठाकूर यांनी केले. यापुढे खारपाटील यांनी आयुष्यापेक्षा ध्येय मोठे असले पाहिजे, अशी शिकवण आबांनी आमच्यात रुजवली. त्यांनीच साठविलेल्या पुंजीतून आणि थोड्याफार कंपनीच्या निधीतून आम्ही आई-वडिलांच्या नावाने ज्ञानमंदिर उभारले आहे. या पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचा विस्तार आणि कारभार आता वाढला आहे. त्यामुळे आमचे वरिष्ठ महाविद्यालयाचे स्वप्न आहे. ते लवकरच पूर्णत्वास जाईल. असे सांगून, मी ठाणे येथे महाविद्यालयीन शिक्षण घेतले त्या वेळची परिस्थिती वेगळी होती. आताची पिढी खूप हुशार आहे. शिक्षणाची बाजू महत्त्वाची असून, ती भक्कम करणे काळाची गरज आहे, यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, नवी मुंबईचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहुले, सरपंच भास्कर मोकल, संतोष ठाकूर तसेच इतरांची यथोचित भाषणे झाली.

यावेळी वार्षिक परीक्षेत व विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच गुणवंत शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. याप्रसंगी उपसरपंच सचिन घबाडी, युवराज पाटील, स्नेहल पाटील, परीक्षित ठाकूर, अर्चना ठाकूर, नीता तोडेकर, व्ही.ए. पाटील, एम.एन. पट्टेबहादूर, सुप्रिया म्हात्रे, शुभांगी पाटील आदी उपस्थित होते.

# सुमित चव्हाण यांची नियुक्ती

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय श्रीवर्धनचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी सहाय्यक प्राध्यापक सुमित चव्हाण यांची एसएनडीटी विद्यापीठाने रत्नागिरी विभागासाठी क्षेत्रीय समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. या रत्नागिरी विभागामध्ये रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यापीठांच्या संचलित आणि संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये समाविष्ट आहेत.

या यशाबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय पांडुरंग राणे यांनी त्यांचे क्षेत्रीय समन्वयक निवड पत्र आणि पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींनीही या यशाबद्दल सुमित चव्हाण यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकतीचे मालक श्री. उमेश विनायक आठवले वगैरे ३ यांच्याकडुन माझे अशिलांनी सदर जमिन मिळकत खरेदी करण्याची ठरविली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड | १४१२ | ०-०५-८० | १.१२ |

सदर जमिन मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार याचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यांत, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील जमिन मिळकत निर्बेध व बोजाविरहीत आहे, असे समजुन इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०४/०१/२०२५

सही/-
**ॲड. प्रतिक्षा परबळकर**
०५, श्रुती सारंग सहकारी सोसायटी, युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड



# संविधानाच्या बचावासाठी सावित्रीच्या लेकींनी पुढे यावे



## कामगार नेते महेंद्र घरत यांचे आवाहन

**। उरण । वार्ताहर ।**

राष्ट्रमाता जिजाऊ, पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले व फातिमा बेग यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त गौरव स्त्रीशक्तीचा या कार्यक्रमाचे आयोजन संविधान महोत्सव समिती उलवे नोड, नवी मुंबई यांच्या तर्फे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी कामगार नेते महेंद्र घरत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांनीमहिलांनासंविधानात दिलेले अधिकार अबाधित ठेवायचे असतील तर महिलांनी आजच्या बदलत्या राजकारणाचा अभ्यास करून पुढे यायला पाहिजे, असे आवाहन आपल्या मनोगतात महेंद्र घरत यांनी केले. अतिशय स्तुत्य कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संविधान महोत्सव समितीचे त्यांनी अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या.



### अलिबाग नगरपरिषद पथविक्रेता समिती वर नोंदणीकृत पथविक्रेता प्रतिनिधी पंचवार्षिक निवडणूक सन २०२४-२५ ते २०२९-२०३० पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम

**(नियम १६ पहा)**

निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय :- सहायक निबंधक सहकारी संस्था ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता.अलिबाग जि. रायगड पिन कोड ४०२०१

महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन महाराष्ट्र) नियम, २०१६ नियम १६ या अनुसूची १ च्या तरतुदी यांच्या द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मा. कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या पूर्वमान्यतेने अलिबाग नगरपरीषद पथविक्रेता समितीवरील पथविक्रेत्यामधून सदस्यांची निवड करण्यासाठी निवडणूकीचा सन २०२३-२०२४ सन २०२८-२०१९ या कालावधीकरीता निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करीत जाहीर करीत आहोत आणि या सोबत जोडलेल्या अनुसुचीच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रतिनिधी गट (यात यानंतर ज्याचा निर्देश संबंधीत प्रतिनिधी गट असा करण्यात आला आहे). संबंधातील निवडणूक घेण्याचे नियत करीत आहे.

| अ क्र | प्रतिनिधी गटाचे पदसंख्या | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी चा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामदिर्शेशन पत्रे मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करणे दिनांक व जागा | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक व वेळ व जागा | वैध नामनिर्देशन पत्रांच्या सूची प्रसिद्ध करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अंतिम यादीचे प्रकाशन करण्याचा दिनांक | मतदान ज्या दिनांकास घेण्यास येईल तो दिनांक वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी दिनांक वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | अनुसूचित जाती १ | ६/०१/२०२५ ते १०/०१/२०२५ | जशी येतील तशी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नोटीस बोर्डावर | दिनांक १३/०१/२०२५ सकाळी ११.०० ते ४.०० निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय | दिनांक १३/०१/२०२५ संध्याकाळी ५.०० निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय | दिनांक १४/०१/२०२५ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय | दिनांक १४/०१/२०२५ संध्याकाळी ५.३० वा निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नोटीस बोर्डावर | १९/०१/२०२५ सकाळी१०.०० ते ३.०० अलिबाग नगरपरिषद उर्दु शाळा आंग्रे समाधीजवळ अलिबाग | १९/०१/२०२५ मतदान संपलेनंतर अलिबाग नगरपरिषद उर्दु शाळा आंग्रे समाधीजवळ अलिबाग | १९/०१/२०२५ मतदान मोजणीनंतर लगेचच अलिबाग नगरपरिषद उर्दु शाळा आंग्रे समाधीजवळ अलिबाग |
| २ | अनुसूचित जमाती १ | | | | | | | | | |
| ३ | इतर मागास वर्ग महिला राखीव १ | | | | | | | | | |
| ४ | अल्पसंख्यांक महिला राखीव १ | | | | | | | | | |
| ५ | विकलांग १ | | | | | | | | | |
| ६ | खुला महिला १ | | | | | | | | | |
| ७ | खुला २ | | | | | | | | | |

सही/-
**(श्रीकांत पाटील)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**तथा सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग**

**मा.कामगार आयुक्त**





### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**





### ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**





सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

पनवेल आणि उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांकरिता विद्यावेतनाचे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख **३० नोव्हेंबर २०२४** पर्यंत होती. तथापि सिडको प्रशासनाने विद्यावेतन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत **दि. ३१ जानेवारी** २०२५ पर्यंत वाढविली असुन अद्याप अर्ज सादर न केलेल्या प्रकल्पग्रस्त विद्यार्थ्यांनी विद्यावेतनाचे अर्ज **दि. ३१ जानेवारी** २०२५ पर्यंत **पुनर्वसन विभाग, सिडको लि., ७ वा मजला, टॉवर नं ७, बेलापूर रेल्वे स्टेशन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई** येथे सादर करावेत. दि. ३१ जानेवारी २०२५ नंतर आलेले विद्यावेतनाचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**महाव्यवस्थापक (पुनर्वसन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३८२/२०२४-२५





### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**निविदा सूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी यांच्यातर्फे पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टल वर ई-निविदा प्रणाली द्वारे खुली निविदा सिंगल पाकिट बोली प्रणाली मागविण्यात येत आहे.

**अ.क्र.: 1. कामाचे नाव**: एसएसई/वर्क्स/माणगाव विभागात देखभाल, किरकोळ दुरुस्ती कामे आणि साहित्य पुरवठ्यासाठी विभागीय कंत्राट. **निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-झोनल2024-12ए (दुसरा कॉल), दिनांक: 06.01.2025. एकूण अंदाजित खर्च** : रु. 59,18,487.20 (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 13.01.2025. **बोली बंद होण्याची तारीख आणि वेळ**: 27.01.2025 रोजी सायंकाळी 15:00 वाजेपर्यंत, ऑनलाइन प्रस्ताव/बोल जमा करण्यासाठी. **पूर्णता कालावधी**: 24 महिने, मॉन्सून कालावधीसह.

**अ.क्र.: 2. कामाचे नाव**: रत्नागिरी स्थानकावरील गुड्स शेडच्या छताची दुरुस्ती. **निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-गुड्स-2024-16, दिनांक: 06.01.2025. एकूण अंदाजित खर्च**: रु. 14,33,591.27 (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 13.01.2025. **बोली बंद होण्याची तारीख आणि वेळ**: 27.01.2025 रोजी सायंकाळी 15:00 वाजेपर्यंत, ऑनलाइन प्रस्ताव/बोली जमा करण्यासाठी. **पूर्णता कालावधी**: 5 महिने, मॉन्सून कालावधीसह.

मॅन्युअल स्वरूपातील ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. अधिक तपशीलांसाठी आणि सहभागासाठी **https://www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या. कोणतेही शुद्धीपत्रक/परिशिष्ट हे फक्त याच संकेतस्थळावर उपलब्ध केले जाईल.





केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम
A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

**एआरएम-II शाखा, मुंबई,** ३रा मजला, कॅनरा बँक इमारत, आदी मर्झबान स्ट्रीट, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१. **दूर.:** ८६५५९४८०५४/८६५५९४८०१९. **ई-मेल :** cb6289@canarabank.com

### विक्री सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींसह वाचत सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, कॅनरा बँकच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ज्यांचा कब्जा घेतला होता त्या तारणी धनकोंकडे गहाण/भारग्रस्त असलेल्या खालील विवर्णीत स्थावर मिळकती **मे. कानडे ॲक्वा फार्म प्रा. लि.**, कानडे हाऊस येथे, प्लॉट क्र. १४८ इनसाइड सहार कार्गो इस्टेट, डीपी रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९९, त्याचे संचालक/ हमीदार प्रतिनिधित्व करतात. **(१) श्री. सुनील बी. कानडे (२) श्री. आनंद डी. कानडे (३) श्री. दीनानाथ बी. कानडे** यांच्याकडून कॅनरा बँकेच्या एआरएम II शाखेला थकीत **रु. २४,१५,९८,१६५.८५** (**३०.११.२०२४** रोजीस अधिक पासून पुढील व्याज आणि प्रभार) च्या वसुलीसाठी **१४.०२.२०२५** रोजी 'जसे आहे जेथे आहे' आणि 'जसे आहे जे आहे' तत्त्वाने विकल्या जातील.

| अ. नु | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | ईएमडी |
|---|---|---|---|
| १. | सर्व्हे क्रमांक २२१/१ ते २२१/८, २२२/१ ते २२२/९, २२३/२, २२३/१/१, २३४/१/२, २२९/४, २२९/५, २२९/९, २२९/११ २२९/१२, २२९/१४/२२९/१५, २२९/१७ ते २२९/२४, २२९/२६, २३०/१/१ ते २३०/१/१४, २३२/२, २३२/५, २३२/८, २३२/११ आणि २३२/१४ मालवण देवबाग रोड, गाव देवळी तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग. येथील जमीन आणि इमारत, | रु. २,६६,००,०००/- | रु. २६,६०,०००/- |
| २. | सर्व्हे क्रमांक ६७/२ ते ६७/१०, ६७/१०, ६७/१२ ते ६७/२५, ६७/२८ ते ६७/२९, ६७/३१ ते ६७/३२, ६७/३४ ते ६७/५४, ६७/५६, ६७/५८ ते ६७/६१, ६७/६३ ते ६७/७१, वाशी मसाला रोड, गाव माझगाव ता. तळा, जि. रायगड. येथील जमीन व इमारत. | रु. २,००,००,०००/- | रु. २०,००,०००/- |

इसारा अनामत रक्कम **११.०२.२०२५** रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ५.०० पर्यंत जमा करावी.
इरर चे तपशील आणि इतर कागदपत्र सेवा पुरविठादारास **११.०२.२०२५** रोजीस किंवा पूर्वी सायं. ५.०० पर्यंत सादर करावेत. बँकेकडे कागदपत्र जमा करण्याची तारीख **११.०२.२०२५** रोजीस किंवा पूर्वी सायं. ५.०० पर्यंत. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया कॅनरा बँकेची वेबसाईट **(www.canarabank.com)** मध्ये पुरविण्यात आलेल्या लिंक **"baanknet.com"** चा संदर्भ घ्यावा किंवा सौ. श्रीदेवी नायर, सहाय्यक महा व्यवस्थापक, कॅनरा बँक, एआरएम-II ब्रांच, मुंबई (मो. क्र. ८६५५९४८०५४) किंवा श्री सुमित कुमार, व्यवस्थापक (मो. क्र. ९३४५३३२३२३) इमेल आयडी : **cb6289@canarabank.com** येथे कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा किंवा किंवा सेवा पुरवठादार **"baanknet.com"** (मे.पीएसबी अलायन्स प्रा. लि.) (संपर्क क्र. ७०४६६१२३४५/६३५४९१०१७२/८२९१२२०२२०/९८९२२१९८४८/८१६०२०५०५१, ईमेल: **support.BAANKNET@psballiance.com)** येथे संपर्क साधावा.

**दिनांक : ०४.०१.२०२५**
**ठिकाण : मुंबई**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी,**
**कॅनरा बँक, एआरएम-II शाखा**

## निवडक



### चिरनेर शाळेचे घवघवीत यश

**चिरनेर :** उरण पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या उरण केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत तालुक्यातील चिरनेर प्राथमिक केंद्र शाळेने नेत्रदीपक यश संपादन केले आहे. या सुयशाबद्दल चिरनेर केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकांचेही तालुक्यातून अभिनंदन करण्यात येत आहे. चिरनेर शाळेने केंद्रस्तरीय स्पर्धेत लगोरी (प्रथम) लंगडी (प्रथम) पथनाट्य (प्रथम) नृत्य (द्वितीय) मातीचे शिल्प (प्रथम) समूहगीत गायन (प्रथम) तर तालुकास्तरीय लगोरी स्पर्धेत, चिरनेर भोम शाळा (प्रथम) लंगडी स्पर्धेत चिरनेर रानसई व विंधणेवाडी शाळा (प्रथम), पथनाट्य (प्रथम) मातीचे शिल्प (प्रथम) या शाळांनी उज्वल यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी चिरनेरच्या श्री महागणपतीचे दर्शन घेत आपला आनंद व्यक्त केला. विशेषता: अध्यक्ष सचिन म्हात्रे, उपाध्यक्षा गौरवी पाटील, केंद्रप्रमुख अविनाश नवाळे, उपशिक्षक बळीराम पाटील, सुरेश पाटील, रोशन थळी, शिवप्रसाद पंडित, पल्लवी कांबळे, सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच सचिन घबाडी अन्य शिक्षकांनी स्पर्धा यशस्वी केली.



### कोळवे मरीदेवी धेरंड अंतिम विजयी

**पाली / गोमाशी :** जेएसडब्लू स्टील लिमिटेड डोलवी यांच्या सौजन्याने रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने आणि ओमसाई स्पोर्ट्स क्लब कोळवे यांच्यावतीने शनिवार ता. ४ रोजी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत जिल्ह्यातील नामवंत संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमींनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. या स्पर्धेतील अंतिम लढत मरीदेवी धेरंड आणि नवतरुण कारावी या संघात झाली. या लढतीत मरीदेवी धेरंड हा प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. या संघास रोख रक्कम ३३ हजार रुपये व आकर्षक चषक तर द्वितीय क्रमांक नवतरुण कारावी या संघास रोख रक्कम २२ हजार रुपये व आकर्षक चषक देण्यात आला. या स्पर्धेतील तृतीय क्रमांकाचा मानकरी हनुमान बोरी तर चतुर्थ क्रमांकाचा मानकरी अरुण पाटणी या दोन्ही संघास प्रत्येकी ११ हजार रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू ऋतिक पाटील (धेरंड), उत्कृष्ट चढाई मिथुन मोकल, तर उत्कृष्ट पक्कड निखिल म्हात्रे, पब्लिक हिरो प्रेषित बोरकर यांना आकर्षक बक्षिस दिले.



### विदर्भाचा बादफेरीतील प्रवेश निश्चित

**मुंबई :** मध्यमगती गोलंदाज नचिकेत भुतेच्या अचूक माऱ्यानंतर शतकवीर यश राठोड व करुण नायरने केलेल्या द्विशतकी भागीदारीच्या बळावर विदर्भाने पाचव्या साखळी सामन्यात उत्तरप्रदेशचा आठ गड्यांनी धुव्वा उडवून विजय हजारे करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत सलग पाचवा विजय नोंदविला. या विजयासोबतच विदर्भाने बादफेरीतील स्थानही पक्के केले आहे. विशाखापट्टणम येथे उत्तरप्रदेशने निर्धारित ५० षटकांत ८ बाद ३०७ अशी मजबूत धावसंख्या उभारली. समीर रिझवीने विदर्भाविरुद्ध पुन्हा एकदा शतकी डाव खेळत पाच चौकार व सात षटकारांच्या मदतीने ८२ चेंडूंत १०५ धावा ठोकल्या. याशिवाय माधव कौशिकने ६६ चेंडूंत ४१, प्रियम गर्गने ३४, शिवम मावीने २० चेंडूंत नाबाद ३३, अभिषेक गोस्वामीने ३२ व आर्यन जुयालने २३ धावांचे योगदान दिले. विदर्भाकडून मध्यमगती गोलंदाज भुतेने ६५ धावांत चार गडी बाद केले. दर्शन नळकांडेने ६१ धावांत दोन बळी टिपले.




### टाटा मुंबई मॅरेथॉन २०२५

#### दृष्टिहीन असिफ इक्बाल धावणार

**मुंबई :** कोलकाता इथे राहाणारा दृष्टिहीन असिफ इक्बाल टाटा मुंबई मॅरेथॉन २०२५ मध्ये सहभागी होणार आहे. यावेळी तो पूर्ण मॅरेथॉनमध्ये आपला सहभाग नोंदवणार आहे. २०२३ व २०२४ मध्ये तो अर्ध मॅरेथॉन धावला होता. पण तो त्याच्या दोन मित्र धावपटूंसोबत त्याची पहिली पूर्ण मॅरेथॉन धावणार आहे. ज्यामध्ये ते त्याचे लक्ष्य पूर्ण करण्यात मदत करतील. संपूर्ण मॅरेथॉन ८:१५ वेगाने धावून ५ तास ५० मिनिटांत मॅरेथॉन पूर्ण करण्याचे त्याचे लक्ष्य आहे. माझ्यासाठी, मॅरेथॉन ही केवळ एक शर्यत नाही. तर स्वतःला आणि जगाला दाखवून देण्याची ही एक संधी आहे की आपल्याला वाटत असलेल्या मर्यादा फक्त आपल्या मनात आहेत. असिफ म्हणाला त्याच्या प्रशिक्षणाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तंत्रज्ञानाचा लाभ घेणे. तो एक घड्याळ वापरतो जो त्याचा वेग, सरासरी वेळ आणि अंतरावर रिअलटाईम ऑडिओ अपडेट देतो. दरम्यान, त्याच्या मित्रांच्या कमरेला जोडलेल्या वायरलेस स्पीकरमधून सतत गाणे वाजत राहाते. ज्यामुळे त्याला सोबतच्या धावपटूंची नेमकी स्थिती कळण्यास मदत होते.

## १० वर्षांनी ओढवली पराभवाची नामुष्की

# भारताने गमावली बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

**भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात ५ सामन्यांची बॉर्डर गावसकर टेस्ट सीरिज खेळवण्यात आली. या टेस्ट सीरिजचा शेवटचा आणि निर्णायक सिडनी टेस्ट सामना ३ जानेवारीपासून सुरु होता. मात्र या सामन्याच्या तिसऱ्याच दिवशी ऑस्ट्रेलियाचा ६ विकेट्सने दणदणीत विजय झाला. त्यांनी ३-१ अशी आघाडी घेऊन सीरिज जिंकली आहे. तर टीम इंडियावर पराभवाची नामुष्की ओढवली असून तब्बल १० वर्षांनी टीम इंडियाने बॉर्डर गावसकर ट्रॉफी टेस्ट सीरिज गमावली आहे.**




सिडनी क्रिकेट ग्राउंडवर भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात पाचवा टेस्ट सामना खेळवण्यात आला. या सामन्यात टीम इंडियाचं नेतृत्व जसप्रीत बुमराहने केलं होतं. बुमराहने टॉस जिंकून सुरुवातीला फलंदाजीचा निर्णय घेतला. यावेळी टीम इंडियाने पहिल्या इनिंगमध्ये १८५ धावा केल्या. तर टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाला त्यांच्या पहील्या इनिंगमध्ये १८१ धावांवर ऑल आउट केले. टीम इंडिया ऑस्ट्रेलियाला विजयासाठी मोठं आव्हान देण्याकरता फलंदाजीसाठी उतरली खरी मात्र ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजी अटॅक समोर १५७ धावांवर ऑल आउट झाली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला विजयासाठी १५८ धावांचं आव्हान मिळालं होतं, हे आव्हान ऑस्ट्रेलियाने ६ विकेट्स राखून पूर्ण केलं.

डब्ल्यूटीसी फायनलमध्ये जाण्याच्या आशा कायम ठेवण्यासाठी भारताला सिडनी कसोटी कोणत्याही किंमतीत जिंकायची होती. केवळ विजयच टीम इंडियाला पुढे नेऊ शकत होता. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाने सॅम कॉन्स्टास (२२), उस्मान ख्वाजा (४१), मार्नस लॅबुशेन (६) आणि स्टीव्ह स्मिथ (४) यांच्या विकेट गमावल्या होत्या. यानंतर ट्रॅव्हिस हेड आणि ब्यू वेबस्टर यांनी ४६ धावांची नाबाद भागीदारी करून ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला. भारताकडून प्रसिध कृष्णाने तीन तर सिराजला एक विकेट मिळाली. बुमराह पाठीच्या दुखापतीमुळे बाहेर झाला होता. त्याच्या जागी विराट कोहली नेतृत्त्व करत होता.

### भारतीय संघाने केली चाहत्यांची निराशा

**टीम इंडिया मागील १० वर्षांपासून सलग बॉर्डर गावसकर ट्रॉफी जिंकत आली आहे. २०१४-१५ मध्ये ऑस्ट्रेलियाने चार सामान्यांची बॉर्डर गावसकर ट्रॉफी टेस्ट सीरिज जिंकली होती. त्यावेळी ऑस्ट्रेलियाने २-० ने भारताचा पराभव केला होता. त्यानंतर वर्ष २०१६-१७, २०१८-१९, २०२०-२१, २०२२-२३ अशा चारही वेळा टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा बॉर्डर गावसकर ट्रॉफीमध्ये ३-१ ने पराभव केला होता. मात्र, ऑस्ट्रेलियाने सिडनी टेस्टमध्ये बाजी मारून १० वर्षांनी बॉर्डर गावसकर ट्रॉफी नावावर केली आहे.**

### टीम इंडिया फायनलमधून बाहेर

**२०२५ मध्ये होणाऱ्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये पोहोचण्यासाठी टीम इंडियाला सिडनी टेस्ट जिंकणं अत्यंत महत्वाचं होतं. मात्र आता सिडनीमध्ये ऑस्ट्रेलियाकडून पराभूत झाल्यामुळे टीम इंडियाचे फायनलमध्ये पोहोचण्याचं स्वप्न भंगलं आहे. ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्धची टेस्ट सीरिज ३-१ ने जिंकल्यामुळे आता साऊथ आफ्रिकेनंतर ऑस्ट्रेलिया वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये क्वालिफाय झाली आहे.**

## १३ जानेवारीपासून खो-खो वर्ल्डकप स्पर्धा

### • २४ संघ लढणार • जागतिक पातळीवर ओळख मिळणार



**| मुंबई | वृत्तसंस्था |**

भारतीय मातीच्या खेळाला आता जागतिक पातळीवर ओळख मिळणार आहे. पहिल्या खो-खो वर्ल्डकप स्पर्धेत पुरुष गटात २१ देश आणि महिला गटात २० देशांचा सहभाग असणार आहे. पुरुष खो-खो वर्ल्डकप स्पर्धेला १३ जानेवारीपासून, तर महिला खो-खो स्पर्धेला १४ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे.

खो म्हणत प्रतिस्पर्धी खेळाडू बाद करण्यासाठी धाव घ्यायची, तर प्रतिस्पर्धी खेळाडूने त्याचा चकवा देत खेळाडूंमधून मार्ग काढायचा. शक्ती आणि बुद्धीचा मेळ असलेल्या हा खेळ जागतिक पटलावर पाहण्याची एक वेगळीच पर्वणी क्रीडाप्रेमींना मिळणार आहे. या स्पर्धेत पुरुष विजेत्या संघाला निळी, तर महिला विजेत्या संघाला हिरव्या रंगाची ट्रॉफी मिळणार आहे. उपांत्यपूर्व फेरी १७ आणि १८ जानेवारीला होणार आहे.

### खो-खो पुरुष गट

**पुरुषांच्या स्पर्धेत भारत, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, इंडोनेशिया, दक्षिण कोरिया आणि मलेशिया हे संघ आशिया खंडातून असतील. तर घाना, केनिया आणि दक्षिण आफ्रिका हे देश अफ्रिका खंडातून असतील. तर युरोपमधून इंग्लंड आणि नेदरलँड्स स्पर्धेत उतरतील. कॅनडा आणि युनायटेड स्टेट्स उत्तर अमेरिकेचे प्रतिनिधित्व करतील. दुसरीकडे ब्राझील आणि ऑस्ट्रेलिया अनुक्रमे दक्षिण अमेरिका आणि ओशनियामधून सहभागी होतील.**

### खो-खो महिला गट

**महिला गटात आशिया खंडातून भारत, पाकिस्तान, भूतान, इराण, नेपाळ, इंडोनेशिया, दक्षिण कोरिया आणि श्रीलंका यांचा समावेश आहे. आफ्रिका खंडातून केनिया, दक्षिण आफ्रिका आणि युगांडा हे संघ आहेत. तर पोलंड, इंग्लंड आणि जर्मनी युरोपचे प्रतिनिधित्व करतील. पेरू आणि न्यूझीलंड अनुक्रमे दक्षिण अमेरिका आणि ओशनियामधून स्पर्धेत उतरतील. विशेष म्हणजे उत्तर अमेरिकेतील एकही संघ यंदा महिलांच्या स्पर्धेत सहभागी होणार नाही.**

## राज मोरे याची महाराष्ट्र कुमार गट कबड्डी संघात निवड

**| खांब | वार्ताहर |**

जय बजरंग रोहाचा अष्टपैलू खेळाडू व रोठ खु.गावचा सुपुत्र राज मोरे याची महाराष्ट्र कुमार गट कबड्डी संघात निवड झाली आहे. ८ जानेवारीपासून उत्तराखंड येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय कुमारगट अजिंक्यपद स्पर्धेत तो महाराष्ट्राच्या कुमारगट कबड्डी संघात खेळणार आहे.

सांगली येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद कुमार गट कबड्डी स्पर्धेत रायगड कुमार गट संघाने तृतीय क्रमांक पटकावला. या संघाचे नेतृत्व राज मोरे याने केले होते. या स्पर्धेत रायगड संघाची अतिशय उत्तम कामगिरी राहिली व त्यात राज मोरे याचा सिंहाचा वाटा होता. राजने मागील वर्षी देखील रायगडचे प्रतिनिधित्व केले होते. रायगडच्या युवा लीगच्या संघात देखील समाविष्ट होता. रोह्याच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.



## बुमराह दुखापतीवर काय बोलला

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध सिडनी येथे खेळल्या गेलेल्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीत भारताचा ६ विकेट्सनी पराभव झाला. बुमराहच्या अनुपस्थितीत ऑस्ट्रेलियाला १६२ धावांचे लक्ष्य मिळाले होते. ज्याचा त्यांनी सहज पाठलाग केला. सिडनीत रोहित शर्माच्या अनुपस्थितीत त्याने संघाची धुरा सांभाळली. बुमराहने ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात अजिबात गोलंदाजी केली नाही. भारतीय कॅम्पला बुमराहची खूप आठवण झाली. याबद्दल त्यानेही खेदह व्यक्त केला. त्याचबरोबर आपल्या दुखापतीवरही त्याने प्रतिक्रिया दिली.



सामन्यानंतर बोलताना जसप्रीत बुमराह म्हणाला, हे थोडे निराशाजनक आहे. परंतु कधीकधी तुम्हाला तुमच्या शरीराचा आदर करावा लागतो. तुम्ही तुमच्या शरीराशी लढू शकत नाही. हे निराशाजनक आहे. कदाचित मालिकेतील सर्वो त्तम विकेटवर गोलंदाजी करण्यापासून वंचित राहिलो. पहिल्या डावातील माझ्या दुसऱ्या स्पेलमध्ये मला थोडे अस्वस्थ वाटले आणि मला त्याकडे लक्ष द्यावे लागले. मात्र, एक गोलंदाज कमी असूनही इतर गोलंदाजांनी पुढे येत पहिल्या डावात जबाबदारी स्वीकारली. याचे त्याने कौतुक केले.

## पॅट कमिन्सचा वर्ल्ड रेकॉर्ड

**सिडनी :** पॅट कमिन्सच्या नेतृत्त्वाखाली ऑस्ट्रेलियाच्या संघाने भारताचा पराभव केला. या मालिकेत पॅट कमिन्स एक वेगवान गोलंदाज म्हणून उत्कृष्ट कामगिरी करत संघाचे नेतृत्त्वही चांगले केले. कमिन्स या मालिकेत बुमराहनंतर सर्वाधिक विकेट घेणारा दुसरा गोलंदाज आहे. कमिन्सने या मालिकेत २५ विकेट घेतल्या आहेत. पॅट कमिन्सने सिडनी कसोटीत ३ विकेट्स घेत मोठा विक्रम केला. त्याने भारताच्या दुसऱ्या डावात ऋषभ पंत, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांना बाद केले. अशा प्रकारे डब्ल्यूटीसीच्या इतिहासात त्याच्या २०० विकेट्स पूर्ण झाल्या आहेत.

## मुंबईची विजयी हॅटट्रिक, सौराष्ट्रचा ५ विकेट्सने धुव्वा

### आयुष म्हात्रेचं स्फोटक शतक

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

क्रिकेट टीमने विजयी हजारे ट्रॉफी २०२४-२०२५ स्पर्धेत श्रेयस अय्यर याच्या नेतृत्वात विजयी हॅटट्रिक केली आहे. मुंबईने सी ग्रुपमधील राऊंड ७ मॅचमध्ये सौराष्ट्राचा ५ विकेट्सने धुव्वा उडवला आणि सलग तिसरा विजय साजरा केला. सौराष्ट्रने मुंबईला विजयासाठी २९० धावांचं आव्हान दिलं होतं. मुंबईने हे आव्हान २४ बॉल राखून पूर्ण केलं. मुंबईने ४६ ओव्हरमध्ये ५ विकेट्सच्या मोबदल्यात २९० धावा केल्या. मुंबईचा १७ वर्षीय आयुष म्हात्रे हा विजयाचा शिल्पकार ठरला. तर इतर फलंदाजांनी विजयात योगदान दिलं.




मुंबईसाठी आयुष म्हात्रे याने ९३ बॉलमध्ये ९ सिक्स आणि १३ फोरसह १५९.१४ च्या स्ट्राईक रेटने १४८ धावांची स्फोटक शतकी खेळी केली. आयुषचं हे ३ सामन्यांमधील दुसरं शतक ठरलं. आयुषच्या या शतकामुळे मुंबईच्या विजयाचा मार्ग सोपा झाला. आयुष व्यतिरिक्त इतर ६ फलंदाजांनी दुहेरी आकडा गाठत मुंबईच्या विजयात योगदान दिलं. जय बिस्टा याने ४५ धावा केल्या. प्रसाद पवार याने ३० तर सूर्यांश शेडगेने २० धावा जोडल्या. सिद्धेश लाडने १४ धावा केल्या. तर अर्थव अंकोलेकर आणि कॅप्टन श्रेयस अय्यर या जोडीने मुंबईला विजयापर्यंत पोहचवलं. अर्थव आणि श्रेयस दोघेही नाबाद परतले. अथर्वने १६ तर श्रेयसने १३ धावा केल्या. सौराष्ट्रकडून कॅप्टन जयदेव उनाडकट याने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या. तर धर्मेंदसिंह जडेजा, चिराग जानी आणि प्रणव कारिया या तिघांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

### ऑस्ट्रेलियात रोहित कोहलीचा फ्लॉप शो | भारतीय क्रिकेटमध्ये सुपरस्टार कल्चर नको

# इरफान पठाणचा कोहलीला सवाल

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

**भारताचा माजी ऑलराउंडर इरफान पठाण याने विराट कोहलीवर सडकून टीका केली आहे. भारतीय क्रिकेटमध्ये सुपरस्टार कल्चर नको, असं म्हणत त्याने विराट कोहलीवर निशाणा साधला आहे. एवढेच नाही तर फलंदाजीतील उणीवा भरून काढण्यासाठी तो देशांतर्गत क्रिकेट का खेळत नाही, असा प्रश्नही इरफान पठाण याने उपस्थिती केला आहे.**

भारतीय संघाने जवळपास १० वर्षांनी बॉर्डर गावसकर ट्रॉफी गमावली. सिडनी कसोटी सामन्यात ६ विकेट्स राखून विजय नोंदवत ऑस्ट्रेलियाच्या संघाने बॉर्डर गावसकर ट्रॉफी अंतर्गत खेळवलेली ५ सामन्यांची कसोटी मालिका ३-१ अशी जिंकली.



ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील कसोटी मालिकेत कर्णधार रोहित शर्मासह विराट कोहलीचा फ्लॉप शो चर्चेचा विषय राहिला. खराब फॉर्ममुळे सिडनी कसोटी सामन्यातून रोहित शर्मानं स्वत: माघार घेतली. दुसरीकडे विराट कोहली मात्र फॉर्म नसताना संघात कायम राहिला. सिडनी कसोटी सामन्यात त्याच्या बॅटिंगमधील चमक काही दिसली नाही. भारतीय संघाने मालिका गमावण्यामागच्या कारणांपैकी विराट कोहलीचा खराब फॉर्म हा देखील कारणीभूत आहे. कोहली सातत्याने एकाच पॅटर्नमध्ये बाद होताना दिसून आला. या मुद्यासह इरफान पठाण याने त्याची मागची आकडेवारी काढत कोहलीच्या संघातील स्थानावरच प्रश्नचिन्ह उपस्थिती केले आहे.

सिडनीच्या मैदानात झालेल्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावात भारतीय फलंदाजी कोलमडल्याचे पाहायला मिळाले. गोलंदाजांनी दमदार कामगिरीसह टीम इंडियाला पुन्हा सामन्यात आणलं. पण दुसऱ्या डावातही फलंदाजांनी नांगी टाकली. त्यात विराट कोहलीनं पुन्हा एकदा ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर विकेट फेकली. विराट कोहलीच्या कामगिरीबद्दल पठाण म्हणाला की,२०२४ मध्ये पहिल्या डावात मॅच सेट करणारी खेळीची गरज असताना कोहलीनं फक्त १५ च्या सरासरीने धावा काढल्या. मागील पाच वर्षांतील आकडेवारी काढली, तर त्याच्या (विराट कोहली) सरासरीचा आकडा ३० वरही पोहचत नाही. भारतीय संघाला सिनियर खेळाडूकडून ही अपेक्षा आहे का? मग त्याच्या जागी युवा खेळाडूला नियमित संधी द्या. त्याला तयार व्हायला वेळ मिळेल.

### सचिन तेंडुलकरचा केला उल्लेख

**भारतीय क्रिकेटला सुपरस्टार संस्कृतीची गरज नाही. आपण टीम संस्कृती जपली पाहिजे. विराट कोहली फ्री असताना देशांतर्गत क्रिकेटमध्ये कधी खेळला आहे का, त्याला जवळपास दहा वर्षांहून अधिक काळ झाला असेल. निवृत्तीआधी सचिन तेंडुलकरही देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसला होता. याची आठवण पठाणने करुन दिली.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)